दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

विधान परिषेद महायुतीचा निर्विवाद विजय!

निवडणुकीच्या गणितात देवेंद्र फडणवीसांची जादू

## विधान परिषदेच्या ११ जागांसाठी उभे होते १२

# राजकीय संघर्षाचा निकाल!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधान परिषद निवडणुकीसाठी गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या राजकीय संघर्षाचा निकाल आज लागला. यात महायुतीच्या सर्वच ९ उमेदवारांचा विजय झाला. तर, महाविकास आघाडीच्या दोन उमेदवारांचा विजय झाला आहे. शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील पराभूत झाले.विधान परिषदेच्या ११ जागांसाठी १२ उमेदवार रिंगणात उभे होते. त्यामुळे, कोणत्या उमेदवाराचा पराभव होणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली होती. त्यामध्ये, भाजपाकडे संख्याबळ असल्याने भाजपाचे पाचही उमेदवार विजयी होतील, असा विश्वास भाजपा नेत्यांना होता. तर, महायुती म्हणूनही आमचे सर्वच ९ उमेदवार जिंकतील, असा दावाही भाजपाच्या नेत्यांकडून केला जात होता. भाजपासह महायुतीच्या नेत्यांनाही या विजयाचा विश्वास होता.विधान परिषदेच्या ११ जागांसाठी उभे असलेल्या १२ उमेदवारांपैकी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर आणि जयंत पाटील यांच्यात नेमका कोण विजयी होणार याची उत्कंठा लागून राहिली होती. अखेर, मिलिंद नार्वेकर यांच्या गळ्यात विजयाची माळ पडली असून शेकापच्या जयंत पाटील यांचा पराभव झाला. या निवडणुकीत काँग्रेसची ८ मते फुटल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. या निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीचा वरचष्मा दिसून आला.








### १० वर्षांनंतर पंकजा मुंडेंना गुलाल

परळी मतदारसंघात २०१९च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंचा पराभव झाला. या पराभवानंतर विजयाचा गुलाल उधळण्यासाठी माजी मंत्री पंकजा मुंडेंना तब्बल ५ वर्षांची वाट पाहावी लागली. तत्पूर्वी, २०१४ विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडेंनी परळी मतदारसंघातून धनंजय मुंडेंचा तब्बल २४ हजार मतांनी पराभव करत मोठा विजय मिळवला होता. आता विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने १० वर्षांनंतर पंकजा मुंडेंनी कुटुंबीयांसह विजयाचा गुलाल उधळला.

### प्रज्ञा सातव सहज विजयी, पण वरची मतं कुठे गेली?

काँग्रेसकडून फक्त प्रज्ञा सातव या एकमेव उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होत्या. पण त्यांचे ३७ आमदार आहेत. त्यांच्याकडे असणारी अतिरिक्त १४ मतं नेमकी कुणाकडे गेली? यावर आता पक्षीय पातळीवर चर्चा होणार असून त्यातली पाच मतं अजित पवारांच्या उमेदवारांच्या पारड्यात पडल्याचं आकडेवारीवरून दिसून येत आहे.

### ५ टर्म आमदार असणारे जयंत पाटलांचा पराभव



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या पाठिंब्यावर उभे राहिलेले शेकापचे जयंत पाटील यांचा या निवडणुकीत पराभव झाला. शरद पवार गटाचे १२ आमदार आहेत. या सर्व १२ आमदारांची मतं जयंत पाटील यांना पडली. मात्र, त्याउपर इतर मतांची जुळवाजुळव त्यांना करता आली नाही. त्यामुळे त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

### देवेंद्र फडणवीस यांच्या मॅजिक पॅटर्नची हॅटट्रिक

विधानपरिषद निवडणुकीच्या गणितात देवेंद्र फडणवीसांची जादू कायम असल्याचे पाहायला मिळाले. फडणवीसांचा मॅजिक पॅटर्न सलग तिसऱ्यांदा कायम असल्याचा दिसला. कारण महायुतीचे सर्व ९ उमेदवार विधानपरिषद निवडणुकीत विजयी झाले आहेत.महत्त्वाचे म्हणजे सलग ५ टर्म आमदार असणारे शेकापचे जयंत पाटील जे शरद पवार पुरस्कृत उमेदवार होते, त्यांनाही महायुती आणि फडणवीसांनी धोबीपछाड दिली.

## रिपाइंमध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश!

### पक्षांतर : पुणे येथे प्रवेश सोहळा उत्साहात

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर गटात राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. दांडेकर पूल येथील मांगीरबाबा चौकात हा कार्यक्रम पार पडला. शिखर वाहतूक संघटनेचे अध्यक्ष डॉ. एन.जी. पांडुळे यांच्या नेतृत्वाखाली २२० हुन अधिक कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला. राज्य महिला उपाध्यक्ष प्रियदर्शनीताई निकाळजे यांच्याहस्ते महिलांचा पक्षप्रवेश तसेच जिल्हाध्यक्ष सचिन खरात, शहरप्रमुख अशोक



जगताप यांच्या हस्ते मांगीरबाबा चौकातील शाखेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ॲड. राजाभाऊ सोनावणे, रवी क्षीरसागर, ईश्वर ढोले, रविराज चव्हाण, गौतम सुरडकर राजाभाऊ धिमधिमे, अनिल गायकवाड, गौतम सुरडकर उपस्थित होते. अण्णासाहेब बंडगर, असिफ पटेल, अजय मखरे, लीलाताई कांबळे यांच्यासह अनेकांनी पक्षप्रवेश केला.

## परळीसह जिल्ह्यात आनंदोत्सव

### रणधुमाळी : विजयाच्या घोषणांनी परिसर दणाणला

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज विधानपरिषद निवडणूकीत पहिल्या पसंतीची मते घेऊन दणदणीत विजय संपादन केला. या विजयानंतर परळीसह जिल्ह्यात अक्षरशः आनंदोत्सव साजरा झाला. विधानभवन परिसर आणि भाजप प्रदेश कार्यालया समोर कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करत दिवाळी साजरी केली. कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड मोठा उत्साह यावेळी पहावयास मिळाला.

विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी



आज मतदान झाले.

सायंकाळी निकाल जाहीर झाला, यात पंकजाताई मुंडे पहिल्या पसंतीची मते घेऊन विजयी झाल्या, विजयासाठी २३ मतांचा कोटा असताना त्यांना २६ मते मिळाली. विजयानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी त्यांचं अभिनंदन केलं.

## पूजा खेडकर यांची केंद्राकडून चौकशी

### चर्चेतले : अतिरिक्त सचिवांमार्फत होणार चौकशी

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांच्यावर झालेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी केंद्र सरकारने एकसदस्यीय समिती नियुक्त केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कार्मिक आणि प्रशिक्षण मंत्रालयातील एका अतिरिक्त सचिवांमार्फत ही चौकशी केली जाणार आहे. दुसरीकडे पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केलेला अहवाल केंद्र सरकारला पाठविण्यात येणार आहे. तर पुणे पोलिसांनीही खासगी गाडीवर लाल दिवा लावल्याप्रकरणी खेडकर यांची चौकशी सुरू केली आहे.पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी खेडकर यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील गैरवर्तणुकीबाबतचा तपशीलवार अहवाल राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाला पाठविला आहे. हा अहवाल राज्य शासनाकडून केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व निवृत्तीवेतन मंत्रालय आणि मसुरीच्या लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन अकादमीला पाठविण्यात येणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगातून (यूपीएससी) नॉन क्रिमिलेयर आणि बहुविकलांगता (मल्टिपल डिसॅबिलिटी) या दोन प्रकारांतून खेडकर यांची नियुक्ती झाली आहे. 'यूपीएससी'ने सांगूनही त्या सहा वेळा वैद्याकीय तपासणीसाठी गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्या निवडीला केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणात (कॅट) आव्हान देण्यात आले होते. न्यायाधिकरणाने खेडकरांविरोधात निर्णय दिल्याची माहिती समोर



येत आहे. त्यांनी बहुविकलांगतेबाबत स्वत:हून तपासणी केलेले एमआरआय प्रमाणपत्र स्वीकारण्यात आल्याचेही समोर येत आहे. या बाबी तसेच त्यांची कार्यालयातील गैरवर्तणूक यांची झाडाझडती होणार आहे.

### 'लाल दिव्या'च्या वापराचा तपास सुरू

पूजा खेडकर यांनी मोटारीवर लाल दिव्याचा वापर केल्याने आणि वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी थकीत २१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्याची कारवाई पुणे पोलिसांनी सुरू केली. मात्र पोलिसांच्या पथकाला खेडकर कुटुंबीयांकडून कोणतेही सहकार्य करण्यात आले नाही. त्यांच्या आईने बंगल्याच्या फाटकाला आतून कुलूप लावले व दमदाटी केली. त्यामुळे कारवाई न करताच पोलिसांना माघारी परतावे लागले

## तर आधार कार्ड बरोबर घेऊन या

### राजकीय : खा.कंगना रणौतचं विधान

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत वेगवेगळ्या कारणांमुळे कायम चर्चेत असतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघातून कंगना रणौत खासदार झाल्या आहेत. अभिनेत्री ते खासदार हा त्यांचा प्रवास कायम चर्चेत राहिला. आता कंगना रणौत पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. खासदार झाल्यानंतर त्यांच्याकडे अनेक लोक स्वतःची कामं घेऊन येतात. मात्र, कंगना रणौत यांनी आपल्याला भेटण्यासाठी लोकांनी आपले आधार कार्ड बरोबर घेऊन यावे, असं म्हटलं आहे. त्यांच्या या विधानानंतर विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे.हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघात माझं कार्यालय आहे. प्रत्येकाने आपल्या समस्या किंवा तक्रारी कागदावर लिहून ठेवल्यास त्या ऐकणं आणि समजून घेणं सोप्प होईल.



अनेकवेळा पर्यटक भेटायला येतात आणि सर्वसामान्यांची गैरसोय होते. त्यामुळे मंडी मतदारसंघ क्षेत्रातील आधार कार्ड बरोबर घेऊन यावं. तसेच तुमचं जे काम असेल ते एका कागदावर लिहून आणा. याचं कारण म्हणजे कोणालाही काही अडचण येऊ नये. अन्यथा काय होतं की पर्यटक जास्त येतात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना अडचण निर्माण होते. त्यामुळे मंडी मतदारसंघ क्षेत्रातील आधार कार्ड आणि कामासंदर्भातील लेटर बरोबर आणा, असं कंगना रणौत यांनी म्हटलं आहे.

# पुरवणी'ची बतावणी!

राज्याची खंक झालेली तिजोरी कशी भरणार आणि या खंक होत चाललेल्या तिजोरीची खंत सत्ताधाऱ्यांस आहे का हा खरा प्रश्न आहे. कारण

पगार हातात पडल्यानंतर अवघ्या काही तासांत एखाद्यास चार पैसे हातउसने घ्यावे लागत असतील तर अशी व्यक्ती व्यसनी वा नियोजनशून्य किंवा दोन्ही आहे असेच मानले जाईल. व्यक्तीबाबतचा हा नियम व्यवस्थेसही लागू होतो. ताजा संदर्भ महाराष्ट्र सरकारची कृती. विधानसभेत विनियोजन विधेयक मंजूर झाल्या झाल्या लगेच या सरकारकडून जवळपास ९५ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या. या इतक्या अवाढव्य रकमेस 'पुरवणी' असे म्हणावयाचे असेल तर मग मुख्य काय हा प्रश्न पडतोच. पण त्याचबरोबरीने असे काय आव्हान या सरकारसमोर उभे राहिले की ज्यास तोंड देण्यासाठी लाखभर कोट रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्याची वेळ आली? यातून केवळ पुरवणी या शब्दाचे विडंबन समोर येत नाही, तर त्यातून सरकारच्या अर्थनियोजनाचा कसा फार्स सुरू आहे, हे सत्य समोर येते. फक्त हा फार्स हास्यकारक नाही; तर हास्यास्पद ठरतो. वर्षाच्या खर्चाची बेगमी झाल्यानंतरही काही आकस्मिक कारणांमुळे, नैसर्गिक आपत्तीस सामोरे जावे लागल्यामुळे खर्च वाढतो. अपेक्षित खर्चापेक्षा जास्त रक्कम खर्च होते. हा अनपेक्षित खर्च मंजूर करून घेण्याची सोय सरकारला असावी, यात या पुरवणी मागण्या या कल्पनेचा उगम. विविध योजनांसाठी सरकारी निधी अपेक्षित खर्च, सुधारित खर्च आणि प्रत्यक्ष खर्च अशा पद्धतीने खर्च होतो. यांच्या मध्ये पुरवणी मागण्या ही सोय सरकारला असते. यातील 'पुरवणी' हा शब्दप्रयोग महत्त्वाचा. न्याहारी आणि चौरस जेवण यात जो फरक तोच पुरवणी आणि मूळ अर्थसंकल्पीय तरतूद यात असणे अपेक्षित.तथापि हा फरक पुसून टाकण्याचा चंगच विद्यमान सरकारने बांधलेला दिसतो. यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे. लोकसभा निवडणुकांमुळे राज्य सरकारलाही संपूर्ण अर्थसंकल्प सादर करता आला नाही. त्या वेळी तात्पुरत्या खर्चासाठी लेखानुदान मंजूर करून एक प्रकारे पुरवणी मागण्याच सरकारने मंजूर करून घेतल्या. त्यानंतर मुख्य अर्थसंकल्प सादर झाला. त्याचे विनियोजन विधेयक मंगळवारी मंजूर झाले. ते होते न होते तोवर पाठोपाठ या पुरवणी मागण्या आल्या. हे म्हणजे दणकून जेवण झाल्यावर धुतलेले हात कोरडे व्हायच्या आत पुन्हा ताटावर बसण्याची तयारी करण्यासारखे. एखाद्या व्यक्तीने असे केल्यास त्यास 'भस्म्या' झाला की काय, अशी कुजबुज सुरू होते. या इतक्या पुरवणी मागण्या सादर केल्यामुळे सरकारला हा खर्चाचा भस्म्या झाला किंवा काय, असा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर होकारार्थी नसेलच असे नाही. याबाबतचा संकेत असा की पुरवणी मागण्यांचा आकार मूळ अर्थसंकल्पापेक्षा १० टक्क्यांपेक्षा अधिक नको. पण अन्य अनेक संकेतांप्रमाणे हा संकेतही पायदळी तुडवला जात असेल तर आश्चर्य ते काय! ताज्या अर्थसंकल्पानंतर सादर करण्यात आलेल्या या पुरवणी मागण्यांचा आकार १५ टक्के इतका आहे. याचे दोन अर्थ निघतात. एक म्हणजे मूळ अर्थसंकल्पातच इतकी खोट आहे की सरकारी नियोजनाचे तीन तेरा झालेले आहेत. किंवा दुसरे असे की अर्थसंकल्प सादर केल्यानंतर सरकार असा काही खर्च करू इच्छिते की ज्यासाठी पैसाही नाही आणि योग्य ती योजनाही नाही. यातील कोणता पर्याय विद्यमान सरकारला लागू होतो हे शेंबड्या पोरासही कळावे. आता या पुरवणी मागण्यांची वाटणी कशी होणार आहे.अंमलबजावणीचा अभ्यास केला, तिची अंमलबजावणी करण्याआधी किती तयारी केली आणि महाराष्ट्राने या योजनेसाठी काय आणि किती पूर्वतयारी केली याचाही तपशील जाहीर झाला तर 'लाडक्या बहिणी'ची अवस्था आर्थिक आघाडीवर काय होईल, याचा अंदाज यावा. वास्तविक विद्यमान राज्य सरकारातील देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांस अर्थ खात्याचा दांडगा अनुभव. तरीही हे असे होणार असेल तर कठीणच म्हणायचे. तेव्हा खऱ्या अर्थाने या पुरवणी मागण्या नाहीत. ही बेजबाबदार खर्चाची, उधळपट्टीची तसेच नियोजनशून्यतेची बतावणी आहे. तीस किती गांभीर्याने घ्यायचे हे शहाण्या-सुरत्यांस कधी समजणार, हाच काय तो प्रश्न.

# नामाचा महिमा !



महाराष्ट्रभूमीला जसा शौर्याचा आणि पराक्रमाचा वारसा लाभला आहे तसा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ठेवाही लाभला आहे. महाराष्ट्राला साधू संतांची भूमी असे म्हटले जाते. वारकरी संप्रदाय हे महाराष्ट्राचे सर्वात मोठे भूषण आहे आणि आषाढी-कार्तिकी एकादशीनिमित्त केली जाणारी पंढरपूर वारी हा राज्यातील सर्वात मोठा महोत्सव असतो. आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. आपली सारी व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. या पायपिटीमध्ये तब्येतीची चिंता, खाण्या पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. पांडुरंगाच्या आणि भक्ताच्या अतूट नात्याच्या मिलानोत्सवाला विज्ञानाचे तराजू तोलू शकेल का ? वारकरी संप्रदायाने या महाराष्ट्राला अनेक संत दिले. विठुरायाच्या भक्तीत लिन होऊन या संतांनी साक्षात विठुरायाला प्रसन्न केले. विशेष म्हणजे जात पात यांच्या पलीकडे भक्ती असते याचा प्रत्यक्ष अनुभव विठुरायाने आपल्या भक्तांना दिला आहे. ज्या काळात स्पृश्य- अस्पृश्यता पाळली जात होती, गरीब श्रीमंती भेदाभेद होता त्याही काळात विविध जातीचे विठुरायाचे भक्त संतपदी विराजमान झाले आहेत. पिढीजात श्रीमंतापासून अत्यंत गरीबही आपल्या भक्तीच्या बळावर विठूमाऊलीला प्रिय ठरला आहे. भगवंताच्या दरबारात जाती पातीला, गरीब श्रीमंती भेदभेदाला कवडीचीही किंमत नाही हेच भगवंताने या उदाहरणांतून दाखवून दिले आहे. विठुरायाच्या भक्तीमध्ये लिन होताना आलेल्या अनुभूती आणि मिळालेले ज्ञान या संत मंडळींनी अभंग, ओवी, गवळण आणि भारूड यांच्या माध्यमातून येणाऱ्या पिढीसाठी साध्या सरळ शब्दांत मांडून ठेवले. या संतांचे साहित्य वाचले कि अध्यात्म किती सोपे आहे याची जाण होते. या समस्त ज्ञानगंगेचे सार म्हणजे भगवंताचे नामस्मरण ! ज्ञानेश्वर माउली म्हणतात 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा श्र पुण्याची गणना कोण करी श्रश्र '.तर तुकोबाराय सांगतात 'नामसंकीर्तन साधन पै सोपे श्र जळतील पापे जन्मांतरीची श्रश्र' सर्वच संतांनी नामस्मरणाची महती त्यांच्या त्यांच्या शब्दात वर्णिली आहे. भगवंताच्या प्राप्तीचा सर्वात सुलभ मार्ग म्हणजे नामस्मरण. वारकऱ्यांना वारीमध्ये शेकडो मैलाचे अंतर चालण्याचे बळ देणारे माध्यम सुद्धा श्री विठ्ठलाचे नाम तर आहे. कलियुगातील हीच सर्वोत्तम साधना आहे, त्यामुळे संतांनी नामाचे महत्व जागोजागी अधोरेखित केले आहे. संत सावता माळी यांनी पंढरीला न जाताही नामाच्या बळावर श्री विठ्ठलाला प्रसन्न केले.

नामसाधना अशी साधना आहे जिला वेळेचे, स्थानाचे आणि काळाचे बंधन नाही. 'रामसे बडा रामका नाम' हे प्रत्यक्ष श्रीरामांनीही वानरसेनेच्या माध्यमातून साऱ्या जगाला दाखवून दिले. अर्जुनाचा अंतर्मनात श्रीकृष्णाचा जप अखंड चालू असे त्यामुळे त्याने सोडलेला बाण लक्ष्यभेद घेई. छत्रपती शिवाजी महाराज सदैव 'जगदंब जगदंब' असा जप करत ज्याच्या सामर्थ्यावर त्यांना पातशाह्यांविरुध्द लढण्यासाठी आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी अध्यात्मिक बळ मिळाले. नामस्मरणाचा महिमा आता विज्ञानाच्या पातळीवर सिद्ध झाला आहे. आत्मा आणि परमात्मा यांचे मिलन घडवून आणणारा दुवा म्हणजे नाम. चार युगाच्या कालखंडातील सध्या कलियुग सुरु आहे. कलियुगातील सामान्य जनावरील व्याप पाहता भगवंताने साधी सोपी नामसाधना सांगितली आहे. केवळ अखंड नामाने कोणीही भगवंताची प्राप्ती करू शकतो. परंतु कलियुगातील रज तमाचे प्रदूषण पाहता नामजपाची अखंडता साधने तितकेही सोपे नाही. त्यासाठी नामाच्या जोडीला सत्संग, सेवा, त्याग, प्रीती(निरपेक्ष प्रेम) यांचे महत्व भगवंताने सांगितले आहे. यांची जोड दिली तर हळूहळू नामाचा संस्कार अंतर्मनावर होऊ लागतो. नामाची अखंडता साधल्यावर चराचरात भगवंताचा वास असल्याची अनुभूती येते, मग भगवंताला भेटण्यासाठी कुठे अन्यत्र जाण्याची आवश्यकताच भासत नाही. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यामध्ये भगवंत स्वतः भक्ताकडे आला आहे, भगवंताने भक्ताची सेवा केल्याचीही कित्येक उदाहरणे आहेत. दरवर्षी राज्यातील अनेक ठिकाणी मंदिरांतून, मोठमोठ्या मैदानातून विविध महाराज आणि कीर्तनकार यांची कीर्तने, हरिनाम सप्ताह चालतात. या कार्यक्रमांना हजारोंची गर्दी असते. कीर्तन जरी भागवतावर अथवा रामायणावर असले तरी या सर्वाचे सार 'नाम' हेच असते. या किर्तनांत लोक माना डोलावताना, लिन होताना दिसतात मात्र यांपैकी किती जण कीर्तनाचे सार म्हणजेच 'नाम' घेण्याचा प्रत्यक्षात प्रयत्न करतात. अध्यात्म हे कृतीचे शास्त्र आहे. श्रवणभक्तीला अध्यात्मात अल्प महत्व आहे, तर प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्व आहे. कीर्तनात येऊन 'हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा' म्हणत माना डोलवल्या आणि हरीचे नाम घेण्याचा प्रयत्नच केला नाही, तर देव कसा आपल्याला जवळ करेल ? त्यामुळे कीर्तन प्रवचन हे केवळ ज्ञानार्जनाचे माध्यम नसून कृतिला प्रवृत्त करण्याचे साधन आहे, घरी चित्रपट आणि सासू सूनांचे कार्यक्रम पाहत बसण्यापेक्षा कीर्तन प्रवचनांना जाणे नक्कीच श्रेष्ठ आहे; मात्र अध्यात्मात पुढे जायचे असेल, त्यातील आनंद मिळवायचा असेल, तर नामस्मरणाशिवाय पर्याय नाही. हरिपाठ हजारदा म्हटला आणि माऊलीने सांगितलेले हरी नाम घेतलेच नाही तर माउलींना तरी आवडणार आहे का ? नामस्मरण हा साधनेचा पाया आहे त्यामुळे अध्यात्माची गोडी चाखायची असेल तर नियमितपणे नामस्मरण करण्याला पर्याय नाही.


जगन घाणेकर
मुंबई,मो.९६६४५५९७८०

# अणणाभाऊ साठे जयंतीची कार्यकारिणी

## निवड :अध्यक्षपदी सरवदे तर सचिवपदी वाघमारे



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी बैठक संपन्न झाली बैठकीचे अध्यक्ष माजी नगरसेवक मा. सचीन (आप्पा) सोनवणे व प्रमुख उस्थिती म्हणून मा. प्रशांत वासनिक मा. संतोष (तात्या) थोरात, मा. प्रमोद आण्णा शिंदे, मा. अनिल (भाऊ) निसर्गंध,मा. राजुभाऊ महुवाले, मा. रवी (आण्णा) वघामारे, मा. गोविंद साठे, मा. सुनिल शिंदे, मा. हनुमान क्षिरसागर, मा. पिंटू गव्हाणे, अमोल धनवे, मा.नाना मस्के, मा. कपिल सोनवणे यांच्या उपस्थितीत पार पडली.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यकारणी जाहीर झाली असून सर्वानुमते अध्यक्षपदी अजय सरवदे, तर सचिव पदी बबन वाघमारे, उपाध्यक्ष सय्यद नय्यूम, सहसचिव नितीन मुजमुले, कोषाध्यक्ष दिपक कांबळे, सहकोषाध्यक्ष शामसुंदर जाधव, कार्याध्यक्ष आशिष कुमार चव्हाण, सहकोषाध्यक्ष लखन जोगदंड, संघटक प्रेम कांबळे यांची निवड केली आहे. सदस्य पदी गौतम कांबळे, हर्षद वाडमारे, अँड. श्रीकांत साबळे, मंगेश गायकवाड, विशाल सोनवणे, मनोज बोराडे, संजय लोंढे, अमोल कांबळे, बंटी वाघमारे, प्रवीण जोगदंड, तुकाराम आघाव, राजपाल टाकणखार, सुमित वाघमारे यांची निवड झाली आहे.

# लाडकी बहीण योजनेसाठी खास मोहीम!

## बाजीराव धर्माधिकारी : नाव नोंदणी करण्याचे आवाहन





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्य शासनाने नव्याने सुरू केलेल्या व महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असलेल्या 'मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजने'मध्ये नव्याने नाव नोंदणी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परळी च्या वतीने विशेष नोंदणी अभियान दि. १५ जुलै ते २६ जुलै च्या दरम्यान संपूर्ण परळी शहरामधून राबविण्यात येणार आहे.

१५ ते २६ जुलै या दरम्यान राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे लाडके आमदार ना. धनंजय मुंडे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार तसेच भाजपने त्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या जन्मदिवसाच्या औचित्य साधून या विशेष अभियानाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. या नोंदणी अभियानासाठी परळी वैजनाथ शहरातील प्रत्येक वार्डमध्ये नोंदणी अभियानाची व्यवस्था करण्यात आली असून महिला भगिनींनी योजनेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे घेऊन आपल्या वार्डातील निश्चित करण्यात आलेल्या नोंदणी स्थळी संपर्क साधून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

# केजरीवालांना जामीन



दिल्ली : मद्य घोटाळ्याप्रकरणी गेल्या काही महिन्यांपासून तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अखेर सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. त्यांचा अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. पण त्यांच्या अटकेचं प्रकरण ईडीने सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठाकडे सोपवलं आहे. केजरीवाल यांच्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेचं प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने मोठ्या खंडपीठाकडे पाठवलं आहे.

पान सहा वरून

**एकाच ठिकाणी...**

महसूल विभाग सांभाळत असताना खुप मोठ्या प्रमाणात काळा बाजार करत असल्याचे चर्चा सत्र सुरू झाले आहे तसेच मागील काही महिन्यापुर्व तहसीलदार यांनी लाच स्वीकारल्याचा प्रकार घडला परंतु केज तहसीलचे खरे लाचखोर अधिकारी बाजुला राहीले व बळीचा बकरा तहसीलदार यांना केले असे सुध्दा चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.त्यामुळे केज तहसीलचे नायब तहसीलदार धस साहेब यांनी तर काय तहसील कार्यालया तहसील कार्यालय म्हणण्याची सुध्दा लाज वाटते ऐवढे काळे बाजार केले परंतु आणखी सुध्दा त्यांची बदली का होत नाही असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

**खोटी माहिती...**

कॉल करणारा तुकाराम भिमराव चोपडे रा. दत्तबाग तर्पेनिमगाव ता. गेवराई जि. बीड याने आम्हाला अरेरावीची भाषा करून शिवीगाळ केली. तसेच दगडफेक करणारे ईसम थोड्यावेळाने ऊसातुन बाहेर येणार आहेत. तुम्ही येथेच थांबा अशी खोटी माहिती दिल्या प्रकरणी पोलिस अंमलदार शरद भारती यांच्या फिर्यादीवरून आरोपी तुकाराम भिमराव चोपडे याच्याविरुध्द कलम २१२,३५२ भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**विकासाच्या नावाखाली...**

ऐवढा निधी आला तेवढा निधी आला,याच्या पोष्ट समाज माध्यमातून पसरवल्या जातात पण आलेले निधी गाळणीतू गाळून घेऊ पर्यंत त्याला आमदारा पासुन स्थानिक नेते,सरपंच यांच्या पर्यत काहीच शिल्लक रहात नाही.तयार रस्ते दोन ते तीन महिन्याच्या पुढे टिकत नाहीत.सब गोलमाल है भाई. हे घोटाळे आर्थिक तर आहेच पण नागरिकांना हक्कापासून वंचित करणारे आहे.नागरिकांचा छळ करणारा आहे.पण रस्ता तर सगळ्या लोकांसाठी आवश्यक आहे.रोजची नितांत गरज आहे.ती गरज भागवण्यात भाजपचे आमदार नमितताई मुंदडा फ ेल ठरलेले आहेत. गुत्तेदारानां व स्थानिक नेते म्हणवणाऱ्या लोकांना जर मतदारसंघातील काम टक्केवारी घेऊन विकत असतील तर दर्जेदार कामे कसे होतील .

**कारवाई करण्याचे...**

गुन्हा दाखल होऊन ही त्यांच्यावर अद्याप काहीच कारवाई का होत नाही खालच्या कर्मचारी यांना वेगळा न्याय व वरिष्ठ अधिकारी यांना वेगळा न्याय का ? म्हणुन या प्रकरणात जे अधिकारी दोषी ठरवले आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना तात्काळ निलंबित करावे या मागणीसाठी सोमवार दिनांक १५/७/२०२४ रोजी मा जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे बेमुदत बैठा सत्याग्रह आंदोलन करण्यात असल्याचे रिपब्लिकन नेते छानराज क्षेत्रे निवेदनात म्हटले आहे.

**केजमध्ये महसुल...**

कार्यालयावर निदर्शने, १२ जुलैरोजी लेखणी बंद आंदोलन तर १५ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनामध्ये केज तहसील कार्यालयातील मधील जी.पी. ननवरे, पवार के. के . पठाण, जे. डी. तोळमारे, शिकलगार एस., उमरे टि.के., भिसे व्ही. आर., खोटे एम. जी . कावळे एक.आर., तपसे एस. आर. आर. आर. सिरसीकर, सोनवणे ए डी, दहीभाते एस. बी., भिंगुलवाड जी. एस., लोखंडे पी. पी., ठोंबरे आर .सी. यांच्यासह अनेक महसूल कर्मचाऱ्यांनी आंदोलनात सहभाग घेतला आहे.आंदोलनामुळे ग्रामीण भागातील विविध योजना साठी येणाऱ्या लोकांची कार्यालयीन कामे प्रभावित झाली आहेत .

**परळीमध्ये महामॅराथॉन...**

९८५०४१७८१७ यांना व त्यांच्या सहकारी शिक्षक तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी यांना संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**कंत्राटी कामगारावर...**

कामगार करणार आहोत जो पर्यंत तीन महिन्याचे पेमेंट मिळत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील यामध्ये काही अनुसूचित प्रकार घडला तर याची सर्वस्व जबाबदारी आपल्या कार्यालयाचे अधिकारी प्रशासनानाकडे असेल. आज आमच्या परिवारावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे असे निवेदनाद्वारे ४३ कंत्राट कामगारांनी म्हटले आहे तरी संमंधीत प्रशासनाने कंत्राट कामगारांच्या निवेदनाची दखल घ्यावी अशी मागणी कंत्राट कामगारांनी निवेदनाद्वारे केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मानसिक आरोग्याची जनजागृती अपेक्षित!

**उपक्रम** | **महाराष्ट्र विद्यालयात व्यवस्थापण कार्यशाळा**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज जिल्हा मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र विद्यालयात 'ताण-तणावाचे व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.याबाबत सविस्तर वृत्त असे की,जिल्हा मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट यांच्या मार्फत महाराष्ट्र विद्यालयात इयत्ता दहावीच्या मुलां-मुलींसाठी 'ताण-तणावाचे व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून मानसिक आरोग्यावर मूलभूत काम करणारे अतुल बडवे (एमपॉवर फेलो,बीड) हे उपस्थित होते.जीवन ताणाशिवाय जगताच येत नाही. पण त्याचे नियंत्रण करता येणे हा एक कौशल्याचा भाग आहे' असे प्रतिपादन श्री.अतुल बडवे यांनी यावेळी बोलताना केले. ताण- तणावाची लक्षणे, त्याची कारणे; ताण- तणाव व्यवस्थापनाची तंत्रे व पद्धती



;ताण कमी करण्याची तंत्रे तसेच मन म्हणजे काय? मन आजारी पडते म्हणजे काय? मन आजारी पडल्यावर काय करावे? कोणते उपचार कोठे घ्यावेत ? इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींवर मुलां-मुलींना बोलते करून संवादाच्या माध्यमातून विवेचन केले. व्याख्यानाच्या शेवटी मुलां-मुलींच्या विविध प्रश्नाला उत्तरे देऊन त्यांच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल महत्त्वपूर्ण अशी जाणीव जागृती निर्माण करण्यात आली. प्रत्येक चार भारतीय मागे एकजण मानसिक आजारी होत असून आपल्या कुटुंबात, आपल्या अवतीभोवती मानसिक आजराने त्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी मोफत सहाय्य व समुपदेशनासाठी १४४१६० या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन याप्रसंगी अतुल बडवे यांनी केले. याप्रसंगी दत्तात्रय मुजमुले (संवाद मित्र) यांनीही विद्यार्थ्यांशी हितगुज केले.

### शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रयत्न

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा .आर एम .काकडे यांनी भूषविले तर पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन श्री सुधाकर तट यांनी केले . शेवटी शाळेच्या वतीने श्री पाचनकर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी प्रयत्न केले.

---

**दखल :** शाहिर उगले यांना मिळाला बहुमान



सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

व्यसनमुक्ती परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या वार्षिक महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा सन्मान पुरस्कार २०२४ शाहीर गईदास उगले त्यांच्या संचातील कलावंतांना देण्यात येणार आहे व्यसनाच्या अनुक्या वेळख्यामध्ये भरकट जाणारा आजचा हा तरुण या तरुणांमध्ये जनजागृती चे काम शाहीर गईदास उगले आणि यांच्या संचातील कलावंत व्यसनापासून दूर राहू असा संदेश कलापथकाच्या माध्यमातून देत असतात याची दखल घेऊन व्यसनमुक्ती परिषद यांच्याकडून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला येत्या नऊ जुलै रोजी मुंबई येथे हा पुरस्कार सोहळा होणार आहे गईदास उगले बप्पासाहेब मनोहर गांडगे सचिन बजरंग धुमाळ श्याम न्यानेश्वर काटे सोपान रतन सूर्यवंशी किशोर संतोष काटे संदीप पान कोंडीराम काळे जयवंत गणपत गायके या कलावंतांना तज्ञ गठीत समितीचे डॉक्टर राजकुमार गवळे व्यसनमुक्ती परिषदेचे सर्व राज्य कार्यकारिणीच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्ष अंजली पाटील मॅडम व प्रदेश सरचिटणीस आजिनाथ शेरकर साहेब महात्मा गांधी सेवा सन्मान पुरस्कार या कलावंतांना जाहीर करण्यात आला आहे

---

# बीड शहर चोरांपासून भयमुक्त करा

**निवेदन :** मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरात सर्वत्र सध्या चोरांचा सुळ-सुळाट सुरु असून वाढत्या चोर्यांमुळे नागरिकांची झोप उडाली आहे त्यामुळे चोरांवर लगाम लावून त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी मनसे जिल्हा सचिव सोमेश कदम व मनसे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी बीडकरांना भयमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज आंदोलन केले असून वाढत्या चोर्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड आणि पोलीस अधिक्षक, बीड यांना दिले आहे.



बीड शहरामध्ये मागच्या दहा दिवसापासून चोरांनी धमाकूळ घातलेला आहे आणि चोरांची भीती प्रचंड बीड शहराच्या नागरिकांमध्ये बसलेली आहे आणि या भीतीमुळे शहराचे वातावरण भीतीमय झालेले आहे आणि अशातच पोलिसांनी देखील कबुली दिली आहे की चोर खूपच खुकार असल्याचे पोलिसांनी देखील हे चोर मोठा दरोडा, रोड रॉबरी त्याचबरोबर खून देखील करण्याच्या तयारीत असल्याचं पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकार्यांनी सांगितल्यामुळे बीड शहरात भीतीच मोठं वातावरण निर्माण झालेला आहे आणि ही परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर गेली की काय? असा प्रश्न बीड शहरातील नागरिकांमध्ये पडलेला आहे. वाढत्या चोर्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे आणि बीडकरांना भयमुक्त करावे लवकरात लवकर परिस्थिती नियंत्रणात नाही आली आणि चोरांना अटक नाही झाली तर आणखीन तीव्र आंदोलन करु असे पत्रकाद्वारे जिल्हा सचिव सोमेश कदम , शहराध्यक्ष करण लोंढे, कुणाल उगले उपजिल्हाध्यक्ष, ऋषिकेश गिराम विद्यार्थीसेना जिल्हाध्यक्ष यांनी पत्रकाद्वारे केले आहे

---

# नौदलात एनसीसी कॅडेटस्ना विशेष संधी

**दिलासा :** नौदल कमांडर बलकार सिंग यांची माहिती

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

एनसीसी बीड सेक्टर च्या वतीने सौ. के. एस. के. महाविद्यालयात महा -कनेक्ट-२०२४ रॅली अंतर्गत नौदल टीमचे जंगी स्वागत करून , एनसीसी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमां मध्ये १४ नौदल अधिकारी ,एकूण १०० एनसीसी कॅडेट्स आणि ७ एनसीसी ऑफिसर्स कार्यक्रमासाठी उपस्थित होते. लेफ्टनंट कमांडर मान सर यांनी सर्व कॅडेट्सना प्रेरित केले आणि नौदल सेवेबाबत त्यांच्याशी संवाद साधला.भारतीय नौदल शाळा, तांत्रिक महाविद्यालये आणि नागरी लोकसंख्येच्या विद्यार्थ्यांशी संलग्न होण्यासाठी भारतीय नौदलाच्या विविध भूमिका आणि जबाबदाऱ्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी अनेक



कार्यक्रम आणि उपक्रम राबवते. महाराष्ट्राच्या उत्तर-मध्य-दक्षिण भागातील किनारपट्टीच्या जिल्ह्यांसह आणि अंतराळात पोहोचण्यासाठी मेसर्स टोयोटा (इंडियन लि.) च्या संयुक्त विद्यमाने ०८ जुलै २४ पासून २५ जिल्ह्यांचा समावेश असलेल्या ३२ जिल्ह्यांचा महा-कनेक्ट कार ड्राइव्हचा समावेश आहे. शहरे आणि तीन रेडियलसह सुमारे ४२१० किमी (संचयी) अंतरप्रवास करणार.

या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना भारतीय नौदल सेनाच्या गौरव शाली इतिहास व कार्याबद्दल परिचित करण्यात आले. या बरोबरच याअभियानाद्वारे एन.सी.सी.कॅडेटसनां नौदल सेवेत कोण कोणत्या प्रकारच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

या संदर्भात सखोल असे मार्गदर्शन कमांडर बलकार सिंग यांनी केले. तसेच पुढे कार्यक्रमात सौ. के. एस. के. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी नौदलच्या सर्व टीमला शुभेच्छा दिल्या. एनसीसी विभाग महाविद्यालयात सदैव चांगले कार्य करत असते, यापुढेही असेच एनसीसी विभागाद्वारे चांगल्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त करून एनसीसी विद्यार्थ्यांनाही त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळंणकर, उप-प्राचार्य डॉ. नारायण काकडे, पी.जी. डायरेक्टर डॉ. अन्सार खान, सुपरवायझर श्री. जालिंदर कोळेकर, कार्यालय अधीक्षक डॉ.विश्वंभर देशमाने डॉ.सुधाकर गुट्टे,एनसीसी बीड सेक्टर चे प्रमुख कॅप्टन डॉ. बी.टी. पोटे, कॅप्टन डॉ.सुनीता भोसले, लेफ्टनंट डॉ. शैलेश अकुलवार, लेफ्टनंट डॉ.जगन्नाथ चव्हाण, सेकंड ऑफिसर प्रदीप राठोड थर्ड ऑफिसर नितीन जाधव, थर्ड ऑफिसर विकास झुंजुर्के यासोबत एनसीसी चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# शाळा व्यवस्थापन समितीक बिनविरोध

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपरी बुद्रुक येथे दिनांक ८ जुलै रोजी शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक प्रक्रिया आरटीई २००९ कायद्यानुसार बिनविरोध पार पडली.या निवडणूक प्रक्रियेसाठी विद्यार्थी पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून शाळेमार्फत प्रत्येक पालकास पत्र व्यवहार करून गावात दोन वेळा दवंडी देण्यात आली होती.

प्रत्यक्ष निवडणुकीच्या दिवशी सर्वानुमते विद्यार्थी संख्येच्या जातनिहाय प्रमाणात सर्वांच्या आवडीने व निवडीने पुढील प्रमाणे शालेय व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली, अध्यक्ष पदी श्री. हनुमान पौळ, उपाध्यक्ष पदी श्री.धुराजी वैराळ तर सदस्य पदी श्री महादेव तूपसमुद्रे श्री सिद्धार्थ राजभोज,श्री पवार संजय ,मौला शेख ,रफिक शेख,श्री बाळकृष्ण पौळ,श्री मुंजाभाऊ सुरनर,तर सचिव पदी मुख्याध्यापक श्री गणेश गिरी सर्वनुमती वरील



सर्वांची शालेय व्यवस्थापन समितीवर नेमणूक करण्यात आली.या नेमणूक प्रक्रियेसाठी शाळेतील शिक्षक वृंद श्री चिंते सर, श्री गायकवाड सर,श्री पठाण सर, श्री घोडके सर,श्री पवार सर,श्रीमती दासूद मॅडम,श्रीमती मस्के मॅडम यांनी सक्रिय सहभाग घेतला. या निवड प्रक्रियेनंतर सरपंच श्री माणिकराव पौळ उपसरपंच श्री गणेश आबा पौळ, ज्येष्ठ नेते उत्तम दादा माने, राष्ट्रवादी काँग्रेस ज्येष्ठ नेते लक्ष्मण( तात्या) पौळ, ज्येष्ठ मार्गदर्शक बबन आप्पा पौळ, उद्धव काळे, रमेश पौळ अशा सर्व मान्यवर मंडळींनी शुभेच्छा दिल्या व शाळेच्या उज्वल भविष्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा अशा अपेक्षा व्यक्त केल्या .

---

# धोंडराई येथे माता-पालक मेळावा उत्साहात

**ऋणानुबंध :** जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचा उपक्रम

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, माध्यमिक विद्यालय धोंडराई येथे शारदा स्पोर्ट्स अॅकॅडमीचे अध्यक्ष तथा युवा नेते रणवीर अमरसिंह पंडित यांच्या प्रेरणेने गुरुवार दि. ४ जुलै रोजी विद्यार्थांसाठी चर्चा सत्र तसेच माता-पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ, तर प्रमुख पाहुणे म्हणून गावातील प्रतिष्ठित नागरीक तसेच पालक उपस्थित होते.

गेवराई तालुक्यातील माध्यमिक विद्यालय धोंडराई येथे शाळेचे मुख्याध्यापक भक्तराज पौळ यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांच्या प्रगती बाबत तसेच गुणवत्तेबाबत माता पालकांशी सुसंवाद साधण्यात आला. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक नवनाथ तिळे, भाऊसाहेब निकाळजे, सिकंदर शेख, गणेश साखरे, मझाबोद्दीन काझी, मुजम्मील



काझी, संतराम टेकाळे, शकील शेख, विष्णु गवारे, नामदेव रावडे, शाहुराव कर्हे, रामदास कदम, दादासाहेब गवारे, गजानन खरात, सलीम कुरेशी, अशोक जायगुडे, नवनाथ गव्हाणे, बप्पासाहेब कचरे, समीर शेख, भिमराव जाधव, मुरलीधर शिंदे, सखाराम नरोटे, मंडलीक बेबी, गीता साखरे, रुपाली प्रधान,अफसर शेक, सुनिता तिळे, नसरीण काझी, यास्मीन शेख, कुसुम प्रधान, ऊषा चातुर, गीता जायगुडे, कौशल्या कदम, रेणुका कर्हे, मंगल गव्हाणे, आस्मा काझी,.मंदा नरोटे, मनिषा नरोटे, शांताबाई बन्सोडे. यांच्या सह माता-पालक तसेच शाळेतील शिक्षक बहिरे बी.जी. ,काकडे एस.बी.,शेंबडे ए.के.,फरतारे बी.एन., काझी एस.एस.,खोजे पी.के., बागडे आर.एम., जगदीश काळे, सौ सुतार मॅडम ,चाटे एम.बी.,आबुज बी.बी. संजय मोटे,शेख एम.ए.,कापसे के. व्ही. पिसाळ सर,कव्हळे सर यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

---

# आदित्य कृषी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रीया

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी, बी.एस्सी. ग्री, बी. टेक. कृषी अभियांत्रिकी व जैवतंत्रज्ञान अभ्यासक्रमाचे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास आदित्य महाविद्य ४ जुलै पासून सुरूवात झालेली आहे. १५ जुलै २०२४ ही अंतिम तारीख असून १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या प्रवेशासाठी आदित्य शिक्षण संस्थेमध्ये मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध विद्यार्थी, पालकांसाठी केलेली आहे.

सदरील केंद्रामध्ये कृषी विषयक विविध अभ्यासक्रमाचे प्रवेश बाबत व त्याच्या भविष्याच्या संधीबाबत तज्ज्ञ प्राध्यापकाकडून नियमित मार्गदर्शन केलं जातं तसेच कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया ४ जुलै २०२४ पासून सुरू असून अंतिम १५ जुलै २०२४ आहे. सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस्सी. ऑनर्स.अग्री), (बी.टेक. जैवतंत्रज्ञान) आणी पदवी शिक्षणासाठी प्रवेश (बी. टेक कृषी अभियांत्रिकी) घेण्यास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न असलेल्या अ दर्जा प्राप्त आदित्य कृषि संलग्न महाविद्यालय बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठीचा कोड नंबर फूड टेक १६१७६ आणि बी एस्सी.कृषि ११११५२, जैवतंत्रज्ञान महाविद्यालय १९१९० कृषी अभियांत्रिकी १५११९५ महाविद्यालय आहे. तरी विद्यार्थ्यांनी फॉर्म भरताना एक नंबरला या महाविद्यालयाचा कोड नंबर द्यावा सदरील सर्व कोर्सेस बाबत मार्गदर्शन आदित्य शिक्षण संस्थेमध्ये सुरू आहे. या संधीचा फायदा सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी (चक्ध-उएढ) परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. दिलेल्या आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी आदित्य कृषि व संलग्न महाविद्यालय नाळवंडी नाका बीड , येथे त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी आणि पालकांनी आदित्य कॅम्पस बीड येथे यावे.

---

**निसर्ग** | **दुडीची फुले दोनशे रुपये किलोवर**

# यंदा रानमेवा खातोय भाव!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

यंदा पावसाचे आगमन वेळेवर झाल्याने सोयगाव च्या जंगलात रानमेवा म्हणून ओळखली जाणारी दुडीची फुले ग्राहकांना पावभर किंवा वाट्याप्रमाणे घ्यावे लागत आहेत. वीस रुपयांपासून वाटा मिळत असून, किलोला सुमारे २०० रुपये मोजावे लागत आहेत.दरम्यान या दुडी च्या फुलांची शहरी भागात मोठी मागणी होत असल्याने सोयगाव चा रानमेवा भाव खातोय. यातून मजुरांना चांगला रोजगार मिळत आहे.

सोयगावच्या वेताळवाडी, काळदरी धिंगापूर आदिंसह सर्वच जंगल भागात रान भाज्या ची आवक वाढली आहे रानभाज्या चे आगार म्हणून सोयगावच्या जंगलाची ओळख आहे रानभाज्या म्हणजे माळरानात व जंगलात



आपोआप उगवणाऱ्या भाज्या. यात दुडीची फुले, कटुरले, अंबाडी, तरोटा, राजगिरी फांदीची भाजी या रानभाज्या सध्या सोयगावच्या जंगलात उगविल्या आहे.

दरम्यान जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात रानमेवा म्हणून ओळखली जाणारी दुडीची फुले उमलली असून, ग्राहकांना आकर्षित करीत आहे.सोयगव तालुक्यातील जंगल भागात रानभाज्या पावसाळ्यात उगवतात. त्यासाठी कोणी त्यांची स्वतःहून लागवड करीत नाही. त्यामुळे रानभाज्यांकडे रानमेवा म्हणून पाहिले जाते. या रानमेव्याची लज्जत काही औरच असते.

कितीही महाग असला तरी हा रानमेवा खवय्यांना हवासा वाटतो. दुडीची फुले, अंबाडी, तांदळाची भाजी, शेवगा आदी रानमेवा येथील शेती व जंगलातून आदिवासी लोक भटकंती करून आणतात.या भाज्या बाजारात उपलब्ध आहेत. कटुरले यायला अजून काही दिवस आहेत. बाजारात सध्या दुडीच्या फुलांनी भाव खाल्ला आहे. २०० रुपये प्रतिकिलो दराने ही फुले विकली जात आहेत

---

# अभाविप शहर कार्यकारणी घोषित

**अभिनंदनिय :** आष्टी शहरात पार पडला सोहळा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद,आष्टी आयोजित उदय छात्रशक्तीचा हे विद्यार्थी संमेलन ड.बी.डी हंबर्डे महाविद्यालय येथे संपन्न झाले. याच विद्यार्थी संमेलनामध्ये अभाविप ची २०२४-२५ ची शहर कार्यकारणी घोषित करण्यात आली.या उदय छात्रशक्तीचा विद्यार्थी संमेलनामध्ये आष्टी शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी,विद्यार्थिनी, प्राध्यापक असे एकत्रित आले होते.यावेळी आष्टी शहराध्यक्ष म्हणून प्रा. अविनाश कंदले व शहर मंत्री म्हणून सागर तोडकर यांची घोषणा करण्यात आली.यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अभाविप पूर्व कार्यकर्ते अक्षय सिरसवाल तर निर्वाचन अधिकारी म्हणून प्रा.डॉ रवी सातभाई हे उपस्थित होते .यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून बीड जिल्हा



पूर्व संघटन मंत्री प्रेम माळी यांनी विद्यार्थी परिषदच्या गौरवशाली ७६ वर्षाच्या इतिहासाची मांडणी केली .१९४९ पासून २०२४ पर्यंत विद्यार्थी परिषदेने केलेल्या विविध देशव्यापी आंदोलने कार्यक्रम याची उजळणी करत विद्यार्थ्यांना माहिती दिली. या उदय छात्रशक्तीचा विद्यार्थी संमेलनाचे प्रास्ताविक शहराध्यक्ष प्रा. अविनाश कंदले यांनी केले तर आभार आष्टी शहरसहमंत्री अजिंक्य म्हस्के यांनी मानले. उदय छात्रशक्तीचा या विद्यार्थी संमेलन कार्यक्रमाचा समारोप गीताने केला.

# ब्रिटनमधील सत्तांतर

ऋषी सुनक पायउतार होऊन, संपूर्ण ब्रिटनमध्ये ऋषी सुनक यांचा दारूण पराभव झाला आहे. मजूर पक्षाचा ऐतिहासिक विजय झाला आहे. सत्तांतरविरोधी लाटेचा फटका मजूर पक्षाला बसला. १४ वर्षांच्या राजवटीत आर्थिक आघाडीवर पिछेहाट, गृहनिर्माणाचे प्रश्न, बेरोजगारी अशा अनेक आघाड्यांवर सुमार कामगिरी करणाऱ्या सुनक यांच्या पक्षाला या निवडणुकीत मतदारांनी चांगलेच पाडले आहे. प्रस्थापितविरोधी लाटेचा फटका या वेळी सुनक यांच्या पक्षाला बसला, हेही एक लक्षवेधी कारण ठरले. ब्रिटनमध्ये कॉन्झर्वेटिव्ह पक्षाची सत्ता संपुष्टात आली आहे आणि ती जाऊन मजूर पक्षाने सत्ता हस्तगत केली आहे. ६५० सदस्यांच्या सभागृहात मजूर पक्षाने ६५० पेक्षा जास्त जागा जिंकून, आपली निर्विवाद वर्चस्व स्थापित केले आहे. टेन डाऊनिंग स्ट्रीट या अधिकृत निवासस्थानातून आपला गाशा पंतप्रधान ऋषी सुनक यांना गुंडाळावा लागणार आहे. आता पंतप्रधानपदाची कमान कीर स्टार्मर हे सांभाळतील आणि ते मजूर पक्षाचे नेते असतील. स्टार्मर यांना दूरध्वनी करूनही, त्यांचे अभिनंदन केल्याचे सुनक यांनी सांगितले. 'आम्ही करून दाखवले' अशा प्रतिक्रिया स्टार्मर आणि त्यांचे पाठिराखे यांनी व्यक्त केल्या.

या निवडणुकीत सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे प्रस्थापितविरोधी लाटेचा सर्वात जास्त तडाख सुनक यांच्या पक्षाला बसला. विशेषतः शेवटच्या काही वर्षांत सरकाराची कामगिरी टीकाकारांच्या आणि विरोधकांच्या केंद्रस्थानी राहिली. सर्वात महत्त्वाचा प्रश्न होता, तो स्थलांतरितांचा. तो सोडववण्यासाठी ब्रिटन सरकारने काहीही केले नाही. जे काही उपाय योजले, ते जनतेच्या मनास आले नाहीत. ब्रेक्झिटनंतर प्रथमच ब्रिटनमध्ये निवडणुका झाल्या होत्या, त्यापूर्वी स्थलांतरितांचा प्रश्न सोडवणे आवश्यक होते; पण सुनक यांच्या पक्षाने काही केले नाही. बहुमत असूनही नेतृत्वात अस्थिरता असे काहीसे चित्र समोर आले. ब्रिटनमधील कॉन्झर्वेटिव्ह पक्षाच्या साम्राज्यावरील सूर्य अखेर १४ वर्षांनंतर मावळला. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या हुजूर पक्षाने ४१० जागा जिंकून, आपले बहुमत प्रस्थापित केले. कीर स्टार्मर हे ब्रिटनचे सातवे पंतप्रधान ठरतील. हुजूर पक्षाला केवळ १२० जागा मिळाल्या. आणखीही काही पक्ष सत्ता स्पर्धेत होते; पण त्यांना केवळ किरकोळ जागा मिळाल्या आहेत. मूळ भारतीय वंशाचे ऋषी सुनक पंतप्रधान पदावरून पायऊतार होत आहेत. दोन वर्षांतील ब्लेअर यांना मिळालेल्या जागांचा विक्रम मोडीत काढणे स्टार्मर यांना शक्य झाले नसले, तरीही स्टार्मर यांनी केलेला पराक्रमही काही कमी महत्त्वाचा नाही. सुनक यांनी सहा महिने कार्यकाळाला बाकी असतानाच, सार्वत्रिक निवडणुका घेण्याची घोषणा केली होती; पण ती त्यांच्या अंगलट आली. अर्थात सहा महिन्यांनी काही फरक पडला नसता. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक सदस्य असतील, त्या पक्षाला ब्रिटनच्या राजसिंहासनाकडून सरकार स्थापनेसाठी आमंत्रण दिले जाते. स्कॉटिश नॅशनल पार्टी आणि डेमोक्रेटिक युनियनिस्ट पार्टी हे दोन पक्ष अनुक्रम उत्तर आयलंडमधील पक्षही त्यांच्यासाठी काम करतात. अलीकडेच अतिउजव्या विचारांच्या पक्षाच्या लोकांनी रिफॉर्म पार्टी स्थापन केली. त्यामुळेही हुजूर पक्षाचे नुकसान झाले. आर्थिक अस्थिरता, घरांचे प्रश्न, भाववाढ, स्थलांतरितांचे प्रश्न या बाबी लक्षात घेऊन, तेथील प्रतिष्ठित वृत्तपत्रांनी मजूर पक्षाला पाठिंबा दिला होता. यामुळे सत्तांतर व्हायलाच हवे, अशी स्पष्ट भूमिका घेऊन प्रतिष्ठित वृत्तपत्रांनी मजूर पक्षाला पाठिंबा दिला होता. स्टार्मर यांची सत्ता आल्या श्रीमंत आणि मध्यमवर्गी यांच्या वर कराची करवत चालवली जाईल म्हणून त्यांना निवडून देऊ नका, असा प्रचार स्टार्मर यांच्या विरोधी पक्षाने सुनक यांना केला होता; पण मतदारांनी त्यांच्या या आवाहनास काहीच प्रतिसाद दिला नाही. ब्रिटनने २०१६ पासून जेव्हा ब्रेक्झिटमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला, तेव्हापासून तो देश आर्थिक संकटात सापडला आहे. हुजूर पक्षाचे डेव्हिड कॅमेरून यांनी ब्रेक्झिटला विरोध केला आणि त्यांचे पंतप्रधानपद गेले. त्यांनंतर हुजूर पक्षाचे चार पंतप्रधान झाले. ब्रिटनच्या पंतप्रधान थेरेसा मे यां ब्रेक्झिटच्या बाजूने होत्या; पण व्यावहारिक स्तरावर ब्रेक्झिटची योजना कशी अमलात आणायची, या बाबतीत त्या निर्णय घेऊ शकल्या नाहीत. ब्रेक्झिट हे ब्रिटनच्या फायद्याचा आहे आणि मी ब्रिटनचे हितच साधेन, अशी वल्गना त्यांनी केली होती; पण त्यांना ते जमले नाही. ते ब्रिटिशांना दिलेले वचन पूर्ण करू शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांचे पंतप्रधानपद जाऊन त्यांच्या जागी नवे पंतप्रधान आले ते बोरिस; पण त्यांच्या काळात कोरोना फोफावला आणि ब्रिटिशांचे मृत्यू ओढवले. बोरिस यांनी कोरोनाविषयक नियमांचा भंग करून पार्टी केली. परिणामी त्यांची सत्ता गेली. त्यांच्यासह त्यांच्या सग्यासोयऱ्यांनी सत्ताकाळात इतर अनेक प्रकारचा भ्रष्टाचार केला. त्यांच्या पक्षाला काही उद्योगपतींकडून फायदेही मिळाले; पण त्यांच्या नेत्याला प्रचंड टीका सहन करावी लागली आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला. आपण सत्तेवर आल्यास ब्रिटनमधील जनतेच्या जीवनात परिवर्तन घडवून आणू, असे आश्वासन स्टार्मर यांनी दिले आहे. पण हे आश्वासन त्यांना पाळणे अवघड आहे की नाही, हे येणारा काळच सांगू शकेल. कारण स्टामर यांची सत्ता आल्या आल्या त्यांना अनेक आव्हाने समोर उभी आहेत. सर्वात मोठे आव्हान आहे, ते लोकांच्या घरांचा प्रश्न सोडवण्याचे. शिवाय ब्रेक्झिटचे आव्हान मोठे आहे. हे प्रश्न सोडवले, तर त्यांची वाटचाल सुखद होणार आहे. अन्यथा त्यांना सुनक यांच्या मार्गाने जावे लागण्याची वेळ दूर नाही. या निवडणुकीत काही भारतीय वंशाचे उमेदवारहो होते. ते सर्वच पराभूत झाले नसले, तरीही त्यापैकी कोण कोण भारतीय जिंकून आले आहेत, हे जाणणे भारतीयांसाठी महत्त्वाचे आहे. प्रीती पटेल, गगन मोहिंद्रा विजयी झाले. हे सारे लेबर पार्टीचे होते. आतापर्यंत जिंकलेल्या भारतीयांची संख्या केवळ दहा आहे; पण त्यापैकी अनेक जण अत्यंत प्रभावशाली आहेत. त्यांचे जिंकणे कूटनीतिकदृष्ट्या आवश्यक होते. पण हे भारतीय वंशाचे लोक स्वतःला जास्त ब्रिटिशांपेक्षाही जास्त ब्रिटिश समजतात.

# साथीचे आजार आणि सज्ज पालिका

**मुंबई डॉट कॉम**

**अल्पेश म्हात्रे**

पावसाच्या उघडझापमुळे मुंबईत मलेरिया, डेंग्यूचा धोका वाढला असून एडस डासांची १९ हजार उत्पत्ती स्थाने पालिकेला आढळून आली आहेत, तर मलेरियाच्या प्रादुर्भावास कारणीभूत अनोफिसीस डासांची अडीच हजार उत्पत्ती स्थाने आढळली आहेत, तर आतापर्यंत ४४३ मलेरिया, तर ९३ डेंग्यूच्या रुग्णांची नोंद आढळून आली आहे. पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथीच्या आजारांनी मुंबईत पाय पसरण्यास सुरुवात केली आहे. जून महिन्यात मलेरियाच्या प्रादुर्भावास कारणीभूत अनोफिसीस डासांची २,७९७ उत्पत्ती स्थाने आढळली, तर डेंग्यूच्या प्रसारास कारणीभूत एडिस डासांची १८,७०१ उत्पत्ती स्थाने आढळली आहेत. त्यामुळे पावसाळी आजारांचा धोका वाढला आहे. दरम्यान जून महिन्यात मलेरिया ४४३, डेंग्यू - ९३, गॅस्ट्रो ७२२ रुग्णांची नोंद झाली आहे.

मलेरिया, डेंग्यू, कावीळ, गॅस्ट्रो, चिकनगुनिया, स्वाईन फ्लू या साथीच्या आजारांचा फैलाव पावसाळ्यात झपाट्याने होतो. पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथीच्या आजारांना रोखण्यासाठी, मुंबई महापालिकेच्या कीटकनाशक विभागाने 'भाग मच्छर भाग' मोहीम हाती घेतली असून, याची जनजागृती सेलिब्रिटींच्या मदतीने करण्यात येत आहे. साथीच्या आजारांचा फैलाव रोखण्यासाठी १ ते ३० जूनदरम्यान घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली. ७ लाख १५ हजार ३२ घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. घराच्या सर्वेक्षणात २९ लाख ८७ हजार ३८८ लोकांचे सर्वेक्षण केले. सर्वेक्षणात १ लाख ४४ हजार १७९ लोकांचे मलेरिया चाचणीसाठी नमुने गोळा केले. मलेरिया नियंत्रणासाठी झाडाझडती घेतली असता ४, ७३० परिसरात तपासणी करण्यात आली त्यात २८ हजार ९२८ मलेरिया डासांची उत्पत्ती स्थानांची संख्या व २, ७९७ ॲनोफिलीस डासांच्या उत्पत्तीची संख्या आढळली. डेंग्यू नियंत्रणासाठी झाडाझडती घेतली असता ११,४५,५०५ घरांची झाडाझडती घेतली त्यात १२,४४,३३० कंटेनरची तपासणी केली असता १८,७०१ एडिस डासांच्या उत्पत्ती स्थाने आढळली. जून महिन्यात साथीच्या आजारांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळून आली. मलेरियाचे ४४३ डेंग्यूचे ९३ , गॅस्ट्रोचे ७२२, कावीळचे ९९ व लेप्टोचे २८, एचवनएनवनचे १० रुग्ण आढळले आहेत .

शहरी क्षेत्रात पावसाळी आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या आनुषंगाने विविध यंत्रणांच्या सक्रिय सहभागाने उपाययोजना करण्यात येत आहेत. पावसाळी आजारांच्या वेळीच प्रतिबंधासाठी मोठ्या प्रमाणात रूग्णांचा त्वरित शोध घेऊन, तत्काळ उपचार करण्यास प्राधान्य द्यावे. यंदा संपूर्ण मुंबई शहरात पावसाळी आजारांसाठी राखीव अशा ३ हजार रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच तापसदृश आजारांसाठी 'फिव्हर ओपीडी'ची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व यंत्रणांनी पावसाळी आजारांच्या प्रतिबंधासाठी एकत्रित पद्धतीने प्रयत्न करावेत, असे निर्देश पालिका आयुक्तांनी दिले आहेत. विविध शासकीय, निमशासकीय, यंत्रणांचा समावेश असलेल्या डास निर्मूलन समितीची आढावा बैठक पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. पालिका अधिकारी प्रमुख रुग्णालयाचे अधिष्ठाता यांच्यासह मुंबईतील विविध शासकीय, निमशासकीय संस्था आणि प्राधिकरणांचे प्रतिनिधी उपस्थित होते. महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी आणखी एका बैठकीमध्ये विभागातील सहाय्यक आयुक्तांनाही पावसाळाजन्य आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन केले. केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, म्हाडा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई विमानतळ, मुंबई पोर्ट ट्रस्ट, नौदल, वायुदल, अभियांत्रिकी सेवा, बेस्ट, डाक विभाग, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., भाभा अणुसंशोधन केंद्र, दुग्ध विभाग अशा शासकीय, निमशासकीय यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी, प्रतिनिधी या बैठकीत सहभागी झाले होते.

समाजासाठी अतिशय घातक अशा डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांवर प्रतिबंधासाठी विविध यंत्रणांच्या सहाय्याने सामूहिक पद्धतीने योगदान गरजेचे आहे. पावसाळ्यातील आगामी तीन महिने हे आव्हानात्मक असणार आहेत. डासांची उत्पत्ती स्थाने शोधून वेळीच प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या पद्धतीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न गरजेचे आहेत. अविरतपणे एकत्र सहभागातून पावसाळी आजारांना प्रतिबंध करण्यासाठी, सर्व यंत्रणांनी योगदान देण्याचे आवाहन पालिका आयुक्त गगराणी यांनी यानिमित्ताने केले.

शहरात पावसाळी आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय पातळीवर अधिकाधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. पालिका आणि खासगी प्रयोगशाळेच्या ठिकाणी नियमितपणे रुग्ण संख्या अद्ययावत करण्यासाठी, प्रयोगशाळांची संख्या २० हून ८०० इतकी करण्यात आली आहे. त्यामुळे मानव-डास साखळी तोडण्यासाठी अधिकाधिक रुग्णसंख्या नोंदवली जाणे गरजेचे आहे. म्हणूनच वेळीच सर्वेक्षण, रुग्ण शोधणे, विलगीकरण आणि उपचार हे सूत्र वापरण्याचे निर्देश पालिका आयुक्तांनी दिले आहेत.



पालिकेच्या प्रमुख चार रुग्णालयांमध्ये पावसाळी आजारांच्या उपचारासाठी एकूण ३ हजार रुग्णशय्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामध्ये राजे एडवर्ड स्मारक रुग्णालय (केईएम) ३० रुग्णशय्या, लोकमान्य टिळक सर्वसाधारण रुग्णालय १६२ रुग्णशय्या, बा. य. ल. नायर रूग्णालय ४११ रुग्णशय्या, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे डॉ. रू. न. कूपर रूग्णालय १०७ रुग्णशय्या तसेच उपनगरीय सर्वसाधारण रुग्णालयात ९६१ रुग्णशय्या याप्रमाणे व्यवस्था करण्यात आली आहे.

पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमधील कम्युनिटी मेडिसिनमधील चार तज्ज्ञ डॉक्टरांचा चमू प्रत्येक विभागामध्ये पावसाळी आजारांच्या उपाययोजनांसाठी मदतीला असणार आहे. या तज्ज्ञ डॉक्टरांचा अनुभव तसेच वैज्ञानिक पद्धतीने रुग्ण हाताळण्याची उपचार पद्धती विभागांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. सध्याच्या उपचार पद्धतीमध्ये असणाऱ्या उणिवा भरून काढणे तसेच रुग्णसंख्या कमी करण्याच्या आनुषंगाने उपचार पद्धतीसाठीचे मार्गदर्शन या डॉक्टरांमार्फत अपेक्षित आहे. मुंबईत डेंग्यू आणि हिवताप (मलेरिया) रुग्णांची अधिक संख्या असलेल्या हॉटस्पॉटच्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागाने विशेष लक्ष केंद्रित (फोकाय) पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार डेंग्यू आणि हिवतापाच्या अधिक रुग्णसंख्येच्या ठिकाणी अधिकाधिक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्यावर पालिकेचा भर आहे. या विभागांच्या ठिकाणी वेळीच सर्वेक्षण मोहीम राबवत, रुग्णसंख्या कमी करण्याच्या आनुषंगाने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तापसदृश लक्षणे जाणवल्यास, नागरिकांनी तत्काळ नजीकच्या रुग्णालयात चाचणी करून घ्यावी. पालिकेच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या ठिकाणी डेंगी आणि हिवतापाच्या मोफत चाचण्या उपलब्ध आहेत. तापसदृश लक्षणे जाणवल्यास किंवा परिसरात डासांची उत्पत्ती स्थाने आढळून आल्यास तत्काळ आपल्या नजीकच्या विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन पालिका प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. विभागीय पातळीवर वॉर रूम तसेच शीघ्र प्रतिसाद चमूची नेमणूकही करण्यात आली आहे. तसेच पुरेशा प्रमाणात औषधांचा साठाही उपलब्ध करून देण्यात आला आहे.

तापसदृश उपचारांसाठी पालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये २४ तास बाह्य रुग्णसेवा उपलब्ध आहे. राजे एडवर्ड स्मारक (केईएम) रूग्णालय दुपारी ४ ते रात्री १०, डॉ. रु. न. कूपर दुपारी २ ते रात्री ८, लोकमान्य टिळक सर्वसाधारण (शीव) रुग्णालय २४ तास, बा. य. ल नायर रूग्णालय दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत, तर उपनगरीय रुग्णालयात सायंकाळच्या वेळेत बाह्य रुग्ण सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याबाबत तज्ज्ञ सांगतात की, साथीचे आजार आटोक्यात आणायचे असेल, तर कोठे पाणी जमा होणार नाही, याची काळजी प्रथम घेतली पाहिजे आणि तसे विशेष अभियान चालवण्याची गरज आहे. नुसते रुग्णालयात खाटा वाढवणे, यावर हा इलाज नव्हे. त्यानंतर शहरात शहरी भागात सर्व यंत्रणांनी मिळून काम करण्याची गरज आहे, ती यावेळी होताना दिसत नाही, तसेच सर्वात म्हणजे जनजागृती होय. साथीचे आजार पसरू नयेत, यासाठी सरकार काही करेल, यावर अवलंबून राहण्यापेक्षा लोकांनीच यासाठी पुढाकार घेतला, तर यावर बऱ्याच प्रमाणात नियंत्रण मिळवू शकू. एका चक्रीय पॅटर्ननुसार प्रत्येक तीन वर्षांमध्ये हे आजार बळवतात. त्याप्रमाणे यंदाच्या वर्षी हे आजार मोठ्या प्रमाणात बळवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. घरात एक जरी रुग्ण असेल, तर तो संपूर्ण कुटुंबाचे आरोग्य बिघडवू शकतो म्हणून व्यक्ती स्वस्थ असेल, तर ती व्यक्ती आपोआप बरी होऊ शकेल, मात्र एखाद्या व्यक्तीला जर पूर्वीचे काही आजार असतील, तर त्याला जास्त त्रास होऊ शकतो म्हणून चांगले खाणे व स्वतःची व कुटुंबाची काळजी घेणे हेच प्रत्येक व्यक्तीच्या हातात आहे. या ग्रहावरून साथीचे आधार कधीही नष्ट होऊ शकणार नाहीत, त्यामुळे मानवानेच यावर आपल्या परीने काळजी घेऊन मात करणे एवढेच हातात आहे.

# महाराष्ट्राला 'मार्वल'च्या माध्यमातून मिळणार आता कृत्रिम बुद्धिमत्तेची साथ

**ब्रिजकिशोर झंवर**

**वरिष्ठ सहायक संचालक**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआय हा सध्या तंत्रज्ञानातील सर्वात लोकप्रिय शब्दांपैकी एक झाला आहे. या तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक पद्धतीने केला, तर मानवाचे जीवन सुकर होऊ शकते. याच उद्देशाने आता जगभर विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढत आहे. महाराष्ट्र पोलीस दलालाही आता 'मार्वल' कंपनीच्या स्थापनेमुळे गुन्ह्यांची उकल गतीने करण्यासाठी, कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाली असून, भविष्यात सर्वच क्षेत्रात अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्राला याचा मोठा लाभ मिळणार आहे. मागील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अनेक नवकल्पना निर्मित होऊन प्रगती साधली जात आहे. अनेक वर्षांपूर्वी ज्या बाबी कल्पनेबाहेरच्या वाटत होत्या, त्या वैज्ञानिक सिद्धांताद्वारे मान्य होऊन हळूहळू वास्तविकतेत रूपांतरित झाल्या. त्याचेच आजचे आधुनिक स्वरूप म्हणून आपण कृत्रिम बुद्धिमत्तेकडे पाहू शकतो.

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे मानवाप्रमाणे विचार करण्यासाठी आणि कार्य करण्यासाठी तयार केलेल्या संगणकामधील मानवी बुद्धिमत्तेचे अनुकरण म्हणता येईल. शिकणे, तर्क करणे, समस्या सोडवणे, समज आणि भाषेचे आकलन ही सर्व या संगणकीय क्षमतांची उदाहरणे म्हणता येतील. संगणक, संगणक-नियंत्रित रोबोट किंवा सॉफ्टवेअर बनवण्याची एक पद्धत आहे, जी मानवी मन आणि बुद्धीप्रमाणे विचार करते. मानवी मेंदूचा अभ्यास करून आणि माहितीचे विश्लेषण करून त्याचे परिणाम दर्शविते. वास्तववादी आणि उच्च गुणवत्तेच्या प्रतिमा, व्हीडिओ आणि ऑडिओ तयार करण्यासाठी सुमारे एक दशकापूर्वी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर भारतात होऊ लागला. त्यासोबतच गुगल एआय, चॅट-जीपीटी आदी माध्यमांतूनही याचा वापर वाढू लागला आहे. त्याचप्रमाणे सिरी किंवा अलेक्सा ही नावे सुद्धा परिचित झाली आहेत. या मशिन्स सुद्धा मर्यादित स्वरुपात कृत्रिम बुद्धिमत्तेचा भाग म्हणता येतील. मानवाप्रमाणे विचार करण्याची कृत्रिम बुद्धिमत्तेची क्षमता सिद्ध होऊ लागली आहे. सध्या चॅटबॉट्सने जगात वादळ आणले आहे. कॉर्पोरेट क्षेत्रात डेटाचे प्रशिक्षण दिले जाऊ लागले आहे. मोठमोठ्या कंपन्या दर्जेदार उत्पादन घेण्यासाठी आणि कामगारांना मदत करण्यासाठी याची मदत घेत आहेत. मानवी आकलनशक्ती आणि तर्कावर आधारित निर्णय घेण्याच्या क्षमतेच्या जोरावर जटिल समस्यांचे निराकरण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जाऊ लागला आहे. गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस दलाला याचा मोठा लाभ होऊ शकणार आहे.

सद्यस्थितीत शासनाच्या विविध विभागांकडे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध असते. पोलीस दलाकडे गुन्हे आणि गुन्हेगारांसंबंधी माहिती मोठ्या प्रमाणावर येत असते. सायबर आणि आर्थिक स्वरुपाच्या गुन्ह्यांच्या संख्येतही मोठी वाढ होत असून नागरिकांच्या फसवणुकीचे नवनवीन मार्ग अवलंबिले जात आहेत. यात गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्हेगारांची संख्या देखील मोठी असते. प्रत्येक बाबीत विविध प्रकारे मानवी मेंदूच्या क्षमतेचा वापर करून आणि उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून गुन्ह्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि या माहितीचा वापर करून विश्लेषण करायला आणि मनुष्याप्रमाणे निर्णय घ्यायला आधुनिक संगणकालाच शिकविले, तर याचा मोठा लाभ होऊ शकतो.



हाच धागा पकडून महाराष्ट्र पोलीस दलात एआयचा वापर करण्यासाठी, 'स्पेशल पर्पज व्हेईकल' स्थापन करून पोलीस दलाला या कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत मिळवून देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने १६ मार्च २०२४च्या बैठकीत घेतला आणि त्या आनुषंगाने तातडीने पावले उचलून 'मार्वल' कंपनीची स्थापना करण्यात आली.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून गुप्तवार्ता क्षमता भक्कम करण्यासाठी आणि अपराधांचा पूर्वानुमान लावण्याची क्षमता वाढविण्यासाठी तसेच राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी राज्यात 'Maharashtra Research and Vigilance for Enhanced Law Enforcement (MARVEL)' 'मार्वल' ही कंपनी स्थापन करण्यात आली आहे. कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कंपनीस शासनामार्फत ४ कोटी २० लाख रुपये प्रतीवर्ष याप्रमाणे पाच वर्षांकरिता १०० टक्के भागभांडवल देण्यात येणार असून भागभांडवलाचा पहिला हप्ता नुकताच वितरीत करण्यात आला आहे. 'मार्वल' स्थापन करण्याबाबत राज्य शासन, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. यांच्यात दि. २२ मार्च २०२४ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात येऊन शासनाची ही कंपनी अधिनियम २०१३ खाली नोंदणीकृत करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर पोलीस जिमखाना येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत राज्याच्या मुख्य सचिव तथा गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक (अतिरिक्त कार्यभार), पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे सादरीकरण करण्यात आले.

पोलीस दलाला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड मिळाल्याने, मशीनला माहितीचे विश्लेषण करून आणि मानवाप्रमाणे विचार करायला शिकवून गुन्ह्यांची उकल करण्यासाठी तसेच होणारे गुन्हे रोखण्यासाठी मोठा लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर गुन्हेगारांची गुन्हे करण्याची पद्धत जाणून, उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून कुठे गुन्हा घडू शकतो, कुठे कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते आदी बाबींचे अनुमान आधीच लावता येऊ शकणार आहे. या उपक्रमातील मे. पिनाका टेक्नोलाजीज खासगी मर्या. ही चेन्नईस्थित कंपनी असून त्यांना भारतीय नौदल, गुप्तवार्ता विभाग, आंध्र प्रदेश, आयकर विभाग, सेबी आदी संस्थांना एआय सोल्युशन्स पुरविण्याचा अनुभव आहे. त्याचबरोबर नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या विशेषज्ञतेचा उपयोग व्हावा, या उद्देशाने 'मार्वल'चे कार्यालय नागपूर येथे भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आवारात आहे. पोलीस दलाच्या मागणीनुसार 'पिनाका' एआय सोल्युशन्स पुरवेल, तर भारतीय व्यवस्थापन संस्था संशोधन आणि प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणार आहे. नागपूर (ग्रामीण)चे पोलीस अधीक्षक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूरचे संचालक हे या कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि मे. पिनाका टेक्नोलाजीज खाजगी मर्या. चे संचालक हे या कंपनीच्या संचालक मंडळावर असणार आहेत. तर नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक हे पदसिद्ध मुख्य कार्यकारी अधिकारी असतील. देशात नावलौकिक असणाऱ्या महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे आणखी वाढणार असून, सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची उकल तातडीने होण्यासाठी हातभार लागेल, यात शंका नाही. 'मार्वल' थेट शासनाच्या गृह विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असणार आहे. त्यामुळे भविष्यात शासनाच्या इतर विभागांनाही कृत्रिम बुद्धिमत्तेचा लाभ मिळून महाराष्ट्र आणि पर्यायाने भारत देश विविध क्षेत्रात जगभरात अग्रेसर राहील, हे निश्चित.

## राशिभविष्य

सोमवार, ८ जुलै २०२४

### || पंचांग ||

आजमिती आषाढ शुद्ध तृतीया शके १९४६, चंद्रनक्षत्र आश्लेषा, योग वज्र, चंद्र राशी कर्क सोमवार, दि. ८ जुलै २०२४ सूर्योदय ०६.०६., सूर्यास्त ०७.२०., चंद्रोदय ०८.०५., चंद्रास्त ०९.२६., राहू काळ ०७.४६ ते ०९.२५. मुस्लीम नूतन वर्षारंभ, हीजरी सन १४४६ प्रारंभ, मुस्लीम मोहरम मसारंभ.

### || भविष्य ||

**मेष** : आपले मनोबल वाढणार आहे.

**वृषभ** : आपल्या अथक परिश्रमाचे फळ मिळणार आहे.

**मिथुन** : मन आनंदी, आशावादी राहणार आहे.

**कर्क** : कामांमध्ये अडचणी आल्यामुळे मन विचलित होण्याची शक्यता आहे.

**सिंह** : आपले वर्चस्व राहील.

**कन्या** : कामाचा व्याप वाढणार आहे.

**तुळ** : जबाबदाऱ्या स्वतःच्या कार्य-कौशल्याने पूर्ण करणार आहात

**वृश्चिक** : स्वकीयांबरोबर मतभेदाच्या प्रसंगातून आपणास जावे लागणार आहे.

**धनु** : आपल्या कामकाजावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करा.

**मकर** : जुने वाद वाद पुन्हा उफाळून येण्याची शक्यता आहे

**कुंभ** : कार्यक्षेत्रामध्ये वाद होण्याची शक्यता आहे.

**मीन** : मनाला दिलासा देणाऱ्या घटना घडतील.

## जनसंवाद

### सत्कार सोहळ्यानंतरचे कवित्व

यंदा वेस्ट इंडिज आणि अमेरिकेमध्ये आयोजित केलेल्या टी-२० क्रिकेटचे विश्वचषक अंतिम विजेतेपद पटकवणाऱ्या जगज्जेत्या भारतीय संघाचे समस्त मुंबईकरांनी न भूतो न भविष्यती अशी गर्दी करून स्वागत केले ते अपेक्षितच होते. कारण मुंबई हीच भारतीय क्रिकेटची पंढरी मानली जाते. या मोठ्या प्रमाणात उसळलेल्या लाखोंच्या गर्दीचे मुंबई पोलिसांनी अचूक नियोजन केल्यामुळे कुठेही गालबोट लागले नाही आणि भारतीय संघाचा सत्कार सोहळा अगदी सुरळीतपणे पार पडला. मात्र या कौतुक सोहळ्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली होती. या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी झाली. काही काळ रुग्णवाहिका अडकून पडल्या. स्टेडियममधील मोठ्या गर्दीला आवरताना कर्मचाऱ्यांची मोठी दमछाक झाली. त्यातच गर्दीमुळे काहींना भोवळ आली. कार्यक्रमानंतर स्वच्छतेचा पुरता बोजवारा उडाला. वानखेडे स्टेडियम, आजूबाजूच्या परिसरात चपलांचा, प्लास्टिकच्या कचऱ्याचा ढीग पसरला. तो निस्तरताना सफाई कर्मचाऱ्यांच्या नाकी नऊ आले. दुसरीकडे या स्पर्धेनंतर लागलीच झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर गेलेल्या भारतीय संघाचा झिम्बाब्वे क्रिकेट संघाने पहिल्या सामन्यात पराभव केला. अर्थात झिम्बाब्वे क्रिकेट संघाला टी-२० क्रिकेटच्या विश्वचषकात अंतिम २० संघात स्थान मिळू शकले नव्हते आणि भारतीय संघात आयपीएलच्या 'स्टार' खेळाडूंचा भरणा होता, ही गोष्ट अलाहिदा!

**- प्रदीप शंकर मोरे**, अंधेरी

### अरुंद रस्ता, नागरिक त्रस्त

जोगेश्वरी पूर्व सगळ्यात जास्त गजबजाटीचे ठिकाण. त्यात जोगेश्वरी पुलाखालून गेल्यावर गांधीनगरपासून रस्ता प्रचंड अरुंद आणि इथून पुढे प्रेमनगर, बांद्रा फ्लॅट, मेघवाडी, शामनगर, सर्वोदय नगर, इंदिरा नगर, कोकण नगर ते थेट म्हाडा कॉलनीपर्यंत जाण्यासाठी एकमेव अरुंद रस्ता आहे. इथे नोकरी-धंदा करून येणाऱ्यांची प्रचंड गर्दी. त्यात इथे सगळ्यात जास्त शाळा आणि त्यांच्या बसेस, छोट्या गाड्या याची कायम ये-जा असते. रस्ता अरुंद असल्याने रिक्षा, दुचाकीवाल्यांची वाट काढण्याची चाललेली घाई, त्यात रस्ता अरुंद असल्याने फूटपाथाचा प्रश्नच येत नाही. मग हे दुचाकी स्वार मिळेल, तशी वाट काढतात. त्यात धक्का लागण्यावरून होणारे वाद. या सगळ्यात जास्त त्रास शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना रोजच सहन करावा लागत आहे. त्यात प्रेमनगरच्या इथे काही रिक्षा चालकाने नवीन रिक्षा थांबा सुरू केला आहे. ते मध्येच रिक्षा वळवतात आणि त्या अरुंद रस्त्यावर आपल्या रिक्षाही बिनधास्त उभ्या करतात. तिथेच भाजी बाजार आणि मासळी बाजार असल्याने आणखीनच गर्दी असते आणि या सगळ्याचा त्रास मात्र जोगेश्वरीतील सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थी सहन करत असतात. त्यामुळे यात प्रकाराची दखल घेऊन स्थानिक राजकारणी आणि रस्ता सुरक्षा पोलिसांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

**- मयूर प्रकाश ढोलम**, जोगेश्वरी

### ब्रिटनमधील राजकारण हे हुजूर आणि मजूर पक्षांभोवती

जगातील सर्वात जुनी लोकशाही म्हणून ब्रिटनचे नाव आहे. त्या ब्रिटनमध्ये नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत गेल्या १४ वर्षांपासून सत्तेत असलेल्या हुजूर पक्षाला ब्रिटनच्या जनतेने सत्तेवरून खाली खेचले. मजूर पक्षाने ६५० जागांपैकी ४१० जागा जिंकून सत्ता मिळवली. हे पाहता ब्रिटनच्या राजकारणाची दिशा बदलू शकते. याच मजूर पक्षाने १९९५ साली टोनी ब्लेअर यांच्या नेतृत्वाखाली ४१८ जागा जिंकल्या होत्या. त्यानंतर आता पहिल्यांदाच चारशेपेक्षा अधिक जागा जिंकण्यात यशस्वी झाला होता. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय वंशाचे २६ लोक निवडून आले आहेत. ब्रिटनमध्ये सत्तांतर होणार, असे सर्वांना वाटत होते. कारण २०१९ पासून ब्रिटनच्या राजकारणात अनेक उलथापालथ झाली. हुजूर पक्षाच्या कारभाराला ब्रिटिश नागरिक अक्षरशः कंटाळून गेले होते. अर्थव्यवस्था ढासळली होती. बेरोजगारी वाढली होती. शिवाय सरकारचा भोंगळ कारभार, सतत नेतृत्वात बदल आदी कारणांमुळे सरकारने लोकप्रियता गमावली होती. तसेच भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांनी ऑक्टोबर २०२२ मध्ये पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतली, तरीही त्यांना आर्थिक आव्हान पेलता आले नाही. परंतु ब्रिटनमधील राजकारण हे हुजूर आणि मजूर या दोन पक्षांभोवती फिरत असते. २०१९च्या निवडणुकीत मजूर पक्षाला अत्यंत मानहानीकारक पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे मजूर पक्ष पुन्हा उभारी घेईल की नाही, अशी शंका ब्रिटनमध्ये व्यक्त केली जात होती. कारण मजूर पक्ष हा मवाळ आणि डावी विचारसरणी असलेला पक्ष मानला जातो. पण या पक्षाने गेल्या पाच वर्षांत फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेऊन, पुन्हा एकदा सत्ता मिळवली. पंतप्रधान होऊ घातलेल्या किर स्टार्मर यांना आता आपल्या पक्षाची धोरणे अधिक मजबुतीने राबवावी लागतील. तसेच सत्तेत आल्यावर व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणू, असे स्टार्मर यांनी निवडून आल्यावर जनतेला दिले आहे. तसेच ऋषी सुनक हे पायउतार झाले, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि स्टार्मर यांच्या सहकार्यातून उभय देशाचे संबंध वृद्धिंगत होतील.

**- सुनील कुवरे**, शिवडी

### चेंगराचेंगरीची जबाबदारी स्वीकारावी!

"चेंगराचेंगरीत १२१ भाविकांच्या मृत्यूबद्दल मला अतीव दुःख झाले आहे. माझ्या संवेदना मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांसह कायम आहे,'' असे स्थानिक धर्मोपदेशक नारायण साकार विश्व हरी उर्फ भोलेबाबा यांनी एक्सवर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या पेक्षा या घटनेची जबाबदारी स्वीकारून चौकशीसाठी पोलिसांच्या स्वाधीन का होत नाही? भोले बाबांच्या सत्संगात भाविकांची चेंगराचेंगरी झाल्याने भोले बाबांनी जबाबदारी स्वीकारून भाविकांच्या पाठीमागे असल्याचे सिद्ध करावे. या चेंगराचेंगरीच्या घटनेत जर आपली चूक नाही, तर आपण लपून का बसला आहात? सत्संगात आपण जे सांगत असता, आपण आचरणात आणले पाहिजे. हे भाविक आपल्या सत्संगात आले होते, तेव्हा त्यांची सुरक्षा करणे, ही देखील तुमची जबाबदारी होती.

**- विवेक तवटे**, कळवा

## घरात घुसून तिघांची गोळ्या झाडून हत्या

### एका संशयिताला अटक

वृत्तसंस्था...

**अल्मेडा (यूएसए) :** अमेरिकेतील कॅलिफोर्नियामध्ये बुधवारी रात्री एका हल्लेखोराने घरात घुसून तिघांची गोळ्या झाडून हत्या केली त्यामुळे परिसरात घबराट पसरली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून एका संशयिताला ताब्यात घेतले. हा गुन्हा करण्यामागचे कारण जाणून घेण्यासाठी पोलीस हल्लेखोराची चौकशी करत आहेत. घटनास्थळावरून फॉरेन्सिक तपासणीसाठी नमुने घेण्यात आले आहेत. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. अल्मेडा पोलीस विभागाने ही माहिती दिली.



एपीडीने फेसबुकवरील एका निवेदनात म्हटले आहे की अल्मेडा शहरातील किट्टी हॉक रोडच्या ४०० ब्लॉकमध्ये त्याच्या शेजाऱ्याला गोळ्या घातल्या गेल्याची तक्रार करणाऱ्या एका व्यक्तीचा कॉल आला.

## अमेरिकेत किराणा दुकानात मिळणार बंदुकीच्या गोळ्या

वृत्तसंस्था...



**वॉशिंग्टनः** अमेरिकन राउंड्स नावाची कंपनी किराणा दुकानात ही व्हेंडिंग मशीन बसवत आहे. कंपनीचे म्हणणे आहे की ही मशीन्स आयडेंटिफिकेशन स्कॅनर आणि फेशियल रिकग्निशन सॉफ्टवेअरने सुसज्ज आहेत, जे खरेदीदाराच्या वयाची पडताळणी करतात. त्यानंतरच तुम्हाला या मशीन्समधून बुलेट सहज खरेदी करता येणार आहे.

अमेरिकेत बंदुकीच्या हिंसाचाराच्या घटना जगातील इतर देशांपेक्षा जास्त आहेत, पण ही वस्तुस्थिती असूनही, अनेक अमेरिकन शहरांमध्ये बंदुकीच्या गोळ्या दूध आणि अंड्यांसारख्या सहज विकत घेता येतात. यासाठी अनेक किराणा दुकानांमध्ये व्हेंडिंग मशीन बसवण्यात आल्या आहेत. या मशीन्समधून तुम्ही कधीही बंदुकीच्या गोळ्या सहज खरेदी करू शकाल. अमेरिकेतील अलाबामा ते ओक्लाहोमा आणि टेक्सासपर्यंत किराणा दुकानांमध्ये बुलेट खरेदी करण्यासाठी या बंदुकीच्या गोळ्या असलेली व्हेंडिंग मशीन मिल्क वेंडिंग मशीनच्या पुढे दिसू शकतात.

## वाहनांना प्रदूषण प्रमाणपत्र मिळणे झाले महाग

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** देशाची राजधानी दिल्लीत वाहनांना प्रदूषण प्रमाणपत्र मिळवणे आता महाग झाले आहे. दिल्ली सरकारने १३ वर्षांनंतर प्रदूषण चाचणीचे प्रमाण वाढवले आहे. आता दिल्लीत पेट्रोल, सीएनजी किंवा एलपीजी दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या प्रदूषण चाचणीसाठी ८० रुपये खर्च करावे लागतील. वाहतूक मंत्री कैलाश गेहलोत यांनी गुरुवारी सांगितले की, दिल्ली सरकारने पेट्रोल, सीएनजी आणि डिझेल वाहनांसाठी प्रदूषण नियंत्रण (पीयूसी) प्रमाणपत्रासाठी शुल्क

### १३ वर्षांनंतर दर वाढले

सुमारे १३ वर्षांनंतर वाढवले आहे.




दुचाकी आणि तीनचाकी वाहनांसाठी पीयूसी प्रमाणपत्राचे शुल्क ६० रुपयांवरून ८० रुपये आणि चारचाकी वाहनांसाठी ८० रुपयांवरून ११० रुपये करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. चारचाकी वाहनांसाठी पीयूसी ११० रुपयांना मिळणार आहे.

## तांब्याचे केबल लंपास करून ट्रकचालक फरार

### पोलिसांत तक्रार दाखल

वृत्तसंस्था

**फोंडा :** उसगाव येथील फिनोलेक्स कंपनीत तांब्याचे केबल घेऊन आलेल्या ट्रकमधून सुमारे २० लाख रुपयांचे तांबे लंपास करून फरार झालेल्या ट्रक चालक अशोक (महाराष्ट्र) याच्याविरुद्ध फोंडा पोलीस स्थानकात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. चिपळूण ते लांजापर्यंतच्या मार्गावर प्रवास करताना तांब्याचे केबल गायब केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार एमएच-०९-एफएल- ७५४७ क्रमांकाच्या ट्रकमधून २६ टन तांब्याचे केबल खेप उसगाव येथील फिनोलेक्स कंपनीत आली होती, पण बुधवारी उसगाव येथे ट्रक पोहचला असता ट्रकमधून तब्बल अडीच टन तांब्याचे केबल लंपास झाल्याचे आढळून आले. तसेच ट्रक चालकसुद्धा फरार झाल्याने या प्रकरणी सुरेश कुमार शर्मा यांनी ट्रक चालक अशोक याच्याविरुद्ध पोलिसांत रीतसर तक्रार दिली. बुधवारी रात्री फोंडा पोलिसांनी फरार झालेल्या ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

## मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तीन दिवस बंद!

देशोन्नती वृत्तसंकलन



**मुंबई :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पुलाचे काम जोरात सुरू आहे. त्यामुळे आज ११ जुलै ते १३ जुलैपर्यंत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोलाडजवळील पुई मसदरा येथे पुलाचे गर्डर बसविण्याचे काम सुरू असल्याने राष्ट्रीय महामार्ग बंद राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ११ जुलै ते १३ जुलैदरम्यान सकाळी ६ ते ८ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत बंद राहणार आहे. यासोबतच मुंबई-गोवादरम्यान वाहनांच्या पासिंगसाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करण्यात आला आहे.

गोव्यातून मुंबईला जाण्यासाठी दुसरा पर्यायी मार्गही ठरवण्यात आला आहे. खोपोली राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ मार्गे कोलाड, रवळजे, पाली मार्गे प्रवासी मुंबईत येऊ शकतात. त्याचबरोबर गोव्याहून मुंबईकडे जाणारा तिसरा मार्ग कोलाड, रावळजे पाली-वाकण फाटादरम्यान निश्चित करण्यात आला आहे.

## मुसळधार पावसामुळे पाच जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट

वृत्तसंस्था



**डेहराडून :** उत्तराखंडच्या अनेक भागात मान्सून अजूनही सक्रिय आहे. राजधानीसह अन्य भागात पावसाची शक्यता आहे. अशी परिस्थिती पाहता हवामान खात्याने राज्यातील ५ जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा यलो अलर्ट जारी केला आहे. यासोबतच विजांचा कडकडाट होण्याचीही शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः पर्यटकांनी राज्यातील हवामानाचे स्वरूप पाहूनच उत्तराखंडमध्ये प्रवेश करावा, असा इशारा देण्यात आला आहे.

राजधानी डेहराडूनसह नैनिताल, उधमसिंह नगर आणि चंपावत जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञांनी वर्तवली आहे. कुमाऊं आणि गढवाल विभागातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, हवामान खात्याने चारधामला जाणाऱ्या प्रवाशांना आणि भूस्खलनग्रस्त भागातील लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. गेल्या बुधवारी डेहराडूनमधील लोकांना उन्हामुळे कडक उन्हाचा सामना करावा लागला होता. या काळात कमाल पारा ३५.२ तर किमान पारा २४ अंश सेल्सिअस नोंदवला गेला. तर पंतनगरमध्ये कमाल तापमान ३५.१ अंश सेल्सिअस, मुक्तेश्वरमध्ये २५ आणि नवीन टिहरीमध्ये २७.४ अंश सेल्सिअस होते.



## उत्तरप्रदेश प्रतापगडमध्ये विजेचे तांडव

# वीज पडून ३८ जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था

**प्रतापगढ :** उत्तर प्रदेशात बुधवारी वीज पडून वेगवेगळ्या घटनांमध्ये ३८ जणांचा मृत्यू झाला. राज्यात पुरामुळे मृत्यू ओढावले आहेत ज्यामुळे सामान्य जीवन ठप्प झाले आहे. प्रतापगडमध्ये वीज पडून ११ मृत्यूंसह सर्वाधिक मृत्यू झाले, त्यानंतर सुलतानपूरमध्ये ७, चंदौलीमध्ये ६, मैनपुरीमध्ये ५, प्रयागराजमध्ये ४, औरैया, देवरिया, हाथरस, वाराणसी आणि सिद्धार्थनगरमध्ये प्रत्येकी एक मृत्यू झाला. या जिल्ह्यांमध्ये डझनभर लोक भाजले आहेत.

औरैया येथे पावसामुळे आंब्याच्या झाडाखाली आसरा घेत असताना एका १४ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. देवरियामध्ये, ५ वर्षांच्या मुलीचा शेतात जाताना विजेचा धक्का लागून मृत्यू झाला जेथे तिचे कुटुंबीय आधीच उपस्थित होते. वाराणसीमध्ये वीज पडून दोन भावांचा मृत्यू झाला, त्यापैकी एक भाजला, तर दुसऱ्यावर सध्या उपचार सुरू आहेत. तथापि, भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) पुढील पाच दिवसांत उत्तर प्रदेश आणि त्याच्या लगतच्या राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आणखी व्यापक पाऊस सुरू राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

### जखमीं नागरिकांचे रुग्णालयात उपचार

प्रतापगडमधील पाच वेगवेगळ्या भागात झालेल्या मृत्यूनंतर त्यांचे मृतदेह गोळा करून पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आले आहेत. दरम्यान, पूर्व उत्तर प्रदेशातील चंदौली येथेही अनेक जण जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बुधवारी दुपारी चार ते सहा वाजेदरम्यान जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. १३ आणि १५ वयोगटातील दोन चुलत भावांसह बहुतेक बळी शेतात काम करताना किंवा मासेमारी करताना विजेचा धक्का बसला. सुलतानपूरमधील सात मृत्यूंपैकी तीन मुले होती. भात लावत असताना किंवा आंबे तोडण्यासाठी किंवा पाणी आणण्यासाठी गेले असता त्यांना विजेचा धक्का बसला. बुधवारी मुसळधार पावसात झाडाखाली आसरा घेत असलेल्या महिलेचा विजेचा धक्का लागून जागीच मृत्यू झाला.

## कठुआ हल्ल्यानंतर अमरनाथ यात्रेवर भीतीचे सावट!

वृत्तसंस्था



**हिरानगर :** गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू-काश्मीरमधील कठुआ दहशतवादी हल्ल्यानंतर दहशतवादी पुन्हा एकदा श्री अमरनाथ यात्रेला लक्ष्य करण्याचा विचार करत आहेत. गुप्तचर यंत्रणांनी दिलेल्या माहितीनुसार, जम्मू-पठाणकोट राष्ट्रीय महामार्गावर एका अज्ञात मोटारसायकलवर एक आयईडी आढळून आला. हल्ला होण्याची चिन्हे आहेत, त्यामुळे लखनपूर ते जम्मू या महामार्गावर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. मोटारसायकल आणि मोठ्या वाहनांची ये-जा करणाऱ्यांची बारकाईने तपासणी केली जात आहे.

जम्मू-पठाणकोट राष्ट्रीय महामार्गावर विशेषतः सांबा आणि कठुआ जिल्ह्यात तैनात असलेल्या चौक्यांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. मंगळवारी राष्ट्रीय महामार्गावरील टोल प्लाझाजवळ सेल्फी पॉइंट-४४ जवळ एक आयईडी आढळून आला.

## जीन्स घातलेल्या वकिलांना न्यायालयाने सुनावले

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** वकिलांनी योग्य पोशाखातच न्यायालयात आले पाहिजे असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने जीन्स घालून आलेल्या वकिलाला खडे बोल सुनावले आहेत. एका वकिलाच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. गुवाहाटी न्यायालयाने जीन्स घालून आलेल्या वकिलाला निलंबित केले होते. त्या निर्णयाविरोधात या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानेही वकिलाला सुनावले आहे.

गुवाहाटी न्यायालयाने पोलिसांना सांगून जीन्स घालून आलेल्या वकिलाला बाहेर जाण्यास सांगितले होते. त्यानंतर

### वकिलाच्या विरोधात याचिका



गुवाहाटी उच्च न्यायालयाने असा निर्णय कसा घेतला? मला पोलिसांकरवी बाहेर का काढले? असे सवाल करत याचिका दाखल केली होती. वकिलाचे म्हणणे हे होते की मी जीन्स घालून आल्याबद्दल माफी मागितली होती. तसेच न्यायालयाने मला जायला सांगितले असते तरीही मी गेलो असतो. पोलिसांकरवी मला बाहेर का काढण्यात आले? मात्र न्यायालयाने वकिलांनी योग्य पोशाखांमध्ये आले पाहिजे असे म्हटले आहे. तसेच या याचिकेतील पोलिसांना बोलावून वकिलाला बाहेर काढले तो उल्लेख काढला आहे. गुवाहाटीच्या एक प्रकरणाची सुनावणी स्थगित केली होती, कारण एक वरिष्ठ वकील न्यायालयात जीन्स घालून आले होते.

हायकोर्टात याचिकाकर्ते वकील बी. के. महाजन जीन्स घालून आले होते. याची दखल घेत न्यायालयाने पोलिसांना बोलावले आणि या वकिलांना पोलिसांकरवी बाहेर काढले. यानंतर या वकिलांना सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. लाईव्ह लॉने हे वृत्त दिले आहे.

## इस्रायलचा गाझाच्या शाळेवर एअरस्ट्राइक

**जेरूसलेम :** इस्रायलच्या सैन्याने गाझामधील एका शाळेवर एअरस्ट्राइक केला असून यात २९ जणांचा मृत्यू झाला आहे. एक आठवड्यात इस्रायलकडून दुसऱ्यांदा शाळेवर हल्ला करण्यात आला आहे. शरणार्थींनी आश्रय घेतलेल्या शाळेला इस्रायलने लक्ष्य केल्याचा आरोप हमासकडून करण्यात आला. तर इस्रायलने हा आरोप फेटाळला आहे.

इस्रायलने आता पॅलेस्टिनी लोकांना खान युनिस रिकामी करण्याचा आदेश दिला आहे. यामुळे तेथील ३ मोठ्या रुग्णालयांना बंद करावे लागले आहे.

## दहशतवादावर प्रहार, द्विपक्षीय सहकार्यावर भर

### ऑस्ट्रियासोबतच्या चर्चेत पंतप्रधान मोदींचे भाष्य

वृत्तसंस्था...

**व्हिएन्ना (ऑस्ट्रिया) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी एक दिवसाच्या ऑस्ट्रिया दौऱ्यावर आहेत. बुधवारी त्यांनी ऑस्ट्रियाचे अध्यक्ष अलेक्झांडर व्हॅन डेर बेलेन यांची भेट घेतली. त्यानंतर ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहमर यांच्याशी संयुक्त चर्चा झाली. यावेळी पंतप्रधान मोदींनी दहशतवादावर प्रहार करताना तीव्र शब्दात निषेध केला. तसेच विविध क्षेत्रात द्विपक्षीय परस्पर सहकार्य वाढवण्यावर भर दिला.

रशियाचा दौरा संपवून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणखी एका युरोपीय देशाच्या दौऱ्यावर ऑस्ट्रियाला पोहोचले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहमर यांची भेट घेतली.

यादरम्यान, पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रियाचे चान्सलर कार्ल नेहमर यांनी जागतिक संघर्ष (विशेषतः युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध) सोडवण्यासाठी संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या महत्त्वावर भर दिला. तसेच दोघांनी संयुक्त पत्रकार परिषदेला संबोधित केले. याप्रसंगी भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असून त्याचा आवाज जगभर ऐकला जातो. भारताचा विश्वासार्ह भागीदार असण्यासोबतच ऑस्ट्रियाला युक्रेनच्या संकटावर शांततापूर्ण तोडगाही हवा आहे.



**पेशावर :** पाकिस्तानमधील पेशावर विमानतळावर उतरत असताना सौदी एअरलाइन्सच्या एसव्ही ७९२ विमानाला आग लागली. लँडिंग गिअरच्या समस्येमुळे टायरला आग लागली. फ्लाइटमध्ये सर्व २७६ प्रवासी आणि २१ क्रू मेंबर्स उपस्थित होते. मात्र, आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती. सर्व प्रवाशांना आपत्कालीन दरवाजातून बाहेर काढण्यात आले.

## रशिया-युक्रेन युद्ध पीएम मोदीच थांबवू शकतात

वृत्तसंस्था

### अमेरिकेचे मोठे वक्तव्य

**वाशिंग्टन :** पंतप्रधान मोदी रशियाला राष्ट्राध्यक्ष पुतीन यांना भेटायला गेले तेव्हा अमेरिकेने चिंता व्यक्त केली होती. मात्र, आता अमेरिकेने भारताची ताकद ओळखली आहे. युक्रेन आणि रशियामधील युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, असा विश्वास अमेरिकेने व्यक्त केला आहे.

युक्रेन-रशिया युद्ध संपवण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका बजावू शकतो, हे अमेरिकेने मान्य केले. अमेरिकेने बुधवारी एक निवेदन जारी करून म्हटले आहे की, भारतामध्ये व्लादिमीर पुतीन यांना युद्ध संपवण्यासाठी पटवून देण्याची क्षमता आहे. मोदींच्या दोन दिवशीय रशिया दौऱ्यानंतर अमेरिकेने हे वक्तव्य केले आहे.

व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या कॅरेन जीन-पियरे म्हणाल्या आम्हाला विश्वास आहे की, भारत आणि रशियाचे चांगले संबंध बघता, भारत राष्ट्राध्यक्ष पुतीन यांना युक्रेनमधील युद्ध संपवण्यासाठी समजू शकेल. युक्रेनसोबतचे युद्ध संपवण्याचे काम अध्यक्ष पुतीन यांचे आहे.

## अमेरिकी बनावटीच्या रायफल्सचा दहशतवाद्यांकडून वापर

वृत्तसंस्था

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमध्ये मागील काही वर्षांपासून दहशतवादी अमेरिकी बनावटीच्या एम ४ कार्बाईन रायफल्स वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे लष्करी तज्ज्ञांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यात दहशतवाद्यांनी नुकताच भीषण हल्ला घडवला. त्या हल्ल्यात एम ४ चा वापर झाल्याचे आढळले.

अमेरिकी लष्कराने २०२१ या वर्षी अफगाणिस्तानमधून आपले सैनिक मागे घेतले. त्या सैनिकांची मागे राहिलेली शस्त्रास्त्रे पाकिस्तानी म्होरक्यांच्या माध्यमातून दहशतवाद्यांपर्यंत पोहचल्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

## वाहून गेलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

**रायगड :** रविवारी रायगडमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता. रायगडाच्या पायऱ्यांवरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत होते. त्याचे व्हिडिओदेखील समोर आले होते.

चार दिवसानंतर त्याचा मृतदेह आढळून आला. मनोज खोपकर असे त्या वाहून गेलेल्या तरुणाचे नाव आहे. यादरम्यान रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या धबधब्यावर पोहण्यासाठी गेला होता.

## विद्यार्थी आता पोलिसांसोबत करणार काम

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** दिल्ली युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी लवकरच दिल्ली पोलिसांसोबत काम करताना दिसू शकतात किंवा असे सांगायचे तर दिल्ली विद्यापीठातील फॉरेन्सिक सायन्सचे विद्यार्थी इंटर्न म्हणून गुन्हेगारीच्या ठिकाणी जाताना दिसतील. यासाठी डीयू दिल्ली पोलिसांशी संपर्क साधण्याचा विचार करत आहे जेणेकरून विद्यार्थ्यांना तपास पथकासह घटनास्थळी जाण्याची परवानगी मिळू शकेल. दिल्ली युनिव्हर्सिटीच्या मानव विज्ञान विभागाने यासाठी एक प्रस्ताव तयार केला आहे जो विद्यापीठाच्या शैक्षणिक परिषदेसमोर मंजुरीसाठी ठेवला जाईल, ज्याची बैठक उद्या म्हणजेच १२ जुलै रोजी होणार आहे.

ही माहिती देताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, विभाग जिल्ह्यांच्या पोलीस उपायुक्तांना (DCP) शिफारस पत्र (LOR) लिहिणार आहे, जेणेकरून त्यांच्या विद्यार्थ्यांना फील्ड अनुभव मिळविण्यासाठी मदत मिळू शकेल. या प्रस्तावात अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांसाठी शएम फॉरेन्सिक सायन्सच्या अभ्यासक्रमात किंचित सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे.

### विद्यार्थी करतील इंटर्नशिप

अंतिम वर्षाचे विद्यार्थी, एक प्रकारे, दिल्ली पोलिसांच्या अंतर्गत इंटर्नशिप करतील जेणेकरून ते गुन्ह्याच्या ठिकाणी भेट देऊ शकतील आणि फॉरेन्सिक पुरावे गोळा करू शकतील, अधिकारी म्हणाला. या प्रस्तावाबाबत अधिक माहिती देताना आणखी एका अधिकाऱ्याने सांगितले की, विद्यार्थ्यांना फॉरेन्सिक सायन्स लॅबमध्ये प्रशिक्षण दिले जाईल आणि कोर्टरूम आणि केस एथनोग्राफीच्या अनुभवावर आधारित प्रकल्प अहवाल तयार करण्यास सांगितले जाईल.

### प्रशासन करत आहे योजना



# मुलींच्या नावे ५ हजारांचे फिक्स डिपॉजिट!

**मंत्री धनंजय मुंडेंच्या वाढदिवसासाचे औचित्य** • **विकास आडे,गोरख पवार राबविणार उपक्रम!** • **कार्यकर्त्यांच्या निर्णयाचे होतेय कौतूक**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमि त्त दि.१५ जुलै रोजी वडवणी तालुक्यात जन्म घेणाऱ्या मुलींच्या भवितव्यासाठी पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉजिट करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते विकास आडे व गोरख पवार यांनी प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले आहे.बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने माजलगाव विधानसभा मतदार संघात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वडवणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते विकास आडे व गोरख पवार यांच्यावतीने सालाबादा प्रमाणे याहीवर्षी सोमवार, दि.१५ जुलै रोजी वडवणी तालुक्यात जन्मलेल्या मुलींच्या नावाने पाच हजार रुपयांचे फिक्स डिपॉजिट करण्याचा निर्णय केला आहे. सदर रक्कम दि वैद्यनाथ अर्बन शाखेत करण्यात येणार असून प्रमाणपत्र सन्मानपूर्वक मुलींच्या मातांकडे बहाल करण्यात येणार आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी आयोजित होणाऱ्या या स्तुत्य उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून याहीवर्षी





दि.१५ जुलै रोजी जन्म णाऱ्या मुलींच्या पालकांनी आपल्या नावाची नोंदणी ९७६४००३२३० आणि ९०४९३०९४५७ या मोबाईल क्रमांकावर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात विशेषतः बीड जिल्ह्यात कमी झालेला मुलींचा जन्मदर आणि स्त्रीभ्रुण हत्या अशा अनिष्ट बाबींना आळा घालण्यासाठी सामाजिक जाणीवेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आपल्या नेत्याचा वाढदिवस सामाजिक उपक्रम साजरा करून त्यांना शुभेच्छा देणार असल्याची भावना विकास आडे व गोरख पवार यांनी व्यक्त केली. उपजिल्हा रुग्णालय, वडवणी यांच्यासह संबंधितांना त्यांनी याबाबत लेखी कळविलेले आहे.

### रक्तदान शिबिराला प्रतिसाद!

कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते विकास आडे व गोरख पवार यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या रक्तदान शिबिरास सचिन बडे,गणेश चोले,संजय कराड,सुनील चव्हाण,दत्ता राठोड,आकाश आडे,रवी पवार,रवीराज राठोड,संजय आडे,सुरेष पवार,अतुल पवार,सखाराम आडे ,बापूराव मुंडे,रमेश मुंडे,नितीन राठोड, शंकर राठोड,लहू राठोड,अमोल राठोड, गहीनाथ पाळवदे,माऊली आडे,केशव आडे,आप्पासाहेब जाधव,माऊली राठोड,रोहित राठोड,बापू राठोड,शाम राव शिंदे, दीपक परवळे,अशोक विभुते,विशाल पवार,राहुल राठोड,बाळू आडे,बाळासाहेब राठोड, अनिल नागरगोजे, गणेश शिंदे, बाळासाहेब मस्के,राहुल सानप, बापूराव मुंडे,उद्धव नाईकवाडे आदी सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सरपंच संघटनेकडून नाष्टा पाण्याची सोय

**माणूसकी : शहरातील पाच ठिकाणी दिली सेवा**




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा महायोध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांची गुरुवार दि.११ रोजी जनजागृती व शांतता रॅली बीडमध्ये प्रचंड समाज बांधवांच्या उपस्थितीत संपन्न झाली. जरांगे पाटील यांच्या या रॅलीस बीड जिल्ह्यातील लाखो मराठा बांधव उपस्थित राहिले होते. सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या वतीने शहरातील पाच ठिकाणी समाज बांधवांच्या सेवेसाठी नाष्टापाण्याची सोय करण्यात आली होती. सरपंच/ उपसरपंच संघटनेचे कार्यकर्ते या कामी परिश्रम घेताना दिसून आले. समाज बांधवाच्या सेवेसाठी कुंडलिक खांडे समर्थकांकडून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचा हजारो बांधवांनी लाभ घेतला.

गुरुवार दि.११ जुलै रोजी मराठा महायोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या जनजागृती व शांतता रॅलीला लाखो मराठा समाज बांधव उपस्थित होते. जिल्हाभरातून आलेल्या मराठा समाज बाधवांसाठी सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या वतीने तब्बल २५ क्विंटल गर्याचा शिरा,२५ क्विंटल तांदळाची खिचडी व ७५ हजार वॉटर बॉटलचे वितरण करण्यात आले. बीड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या नजीक, सुभाष रोड, बार्शी नाका भागात,अंबिका चौक आणि कुंडलिक खांडे यांच्या जालना रोड वरील संपर्क कार्यालय अशा पाच ठिकाणी समाज बांधवांसाठी नाष्टा पाण्याची सोय करण्यात आली होती. सरपंच/ उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत राबवण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमास यशस्वी करण्यासाठी रंजित कदम, कल्याण कवचट, शिनुभाऊ बेद्रे, पांडुरंग गवते, अजय सुरवसे, संतोष घुमरे, कामरान खान, नसीन खान, देवराव घोडके, रोहीदास गोरे, गणेश घोडके, शुभम घोडके, राहूल घोडके, गणेश तळेकर, कल्याण खांडे, गोविंद तळेकर, राजेंद्र तळेकर, रामनाथ रहाडे, राजेश शिंदे, बापुराव नवले, चंद्रसेन चव्हाण, लक्ष्मण खांडे, अशोक शिंदे, गणेश जगताप, शामसुंदर भुसारी, बाबुराव तळेकर यांनी परिश्रम घेतले.

# एकाच ठिकाणी बसले चिकटून!

**चर्चा:केजचे नायब तहसीलदारांची बदली कधी!**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तहसील कार्यालयातील नायबतहसीलदार लक्ष्मण धस यांना केज तहसील कार्यालयात त्यांचा कार्यकाळा पुर्ण होऊन जास्त वर्ष झाले पण त्यांची बदली होत नाही.तसेच ते केज तालुक्याचे भुमीपुत्र असून बीड जिल्ह्यातील रहिवासी आहेत तरी ही त्यांची बदली होत नाही? ते केज तहसील ला नायबतहसीलदार असल्या कारणाने कोणत्या ही कारणाणे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निवडणूक कार्यात त्यांचा सहभाग येतोच तरी ही त्यांची बदली प्रशासनाने का केली नाही हा प्रश्न उपस्थित रहातो.केज तहसीलचे नायब



तहसीलदार यांची बदली कालावधी पुर्ण होऊनही बदली प्रक्रीया लक्ष्मण धस यांच्या बाबतीत होयला पाहिजे बदली करण्यासाठी प्रशासन कोनत्या मुहुर्ताची वाट बघत आहे का?कारण लक्ष्मण धस हे नियमानुसार त्यांचा बदली कालावधी पुर्ण करुन मुदत संपली आहे .तरी बदली का होत नाही?हे न उलगडणारे कोडे.निवडणूक आयोग सोडवावे लागेल का?असा प्रश्न आता नागरिकात चर्चे ला जात आहे.तसेच केज तहसीलचे नायब तहसीलदार पान २ वर...

# खोटी माहिती देणे पडले महागात!

**कारवाई : एका विरोधात गुन्हा दाखल**

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तपोनिमगाव येथील तुकाराम भीमराव चोपडे यांनी डायल ११२ या क्रमांकावर कॉल करून माझ्या घरावर दगडफेक झाल्याची खोटी माहिती दिली. घटनास्थळी गेलेल्या पोलिसांना अरेरावी करत शिवीगाळ देखील केली. याप्रकरणी कॉल करणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल झाला आहे.

तलवाडा पोलिस ठाण्यात दि.११ जुलै रोजी २१.०० वा. पासुन ते दि.१२ जुलै रोजी ९ वाजेपर्यंत डायल ११२ ड्युटीचे कर्तव्य बजावत असताना पोलिस अंमलदार शरद भारती यांना कॉल आला व त्याबर पोह. चालक बागलाने यांनी सदर




कॉलरचा मो.नं-९७६५७४४०९७ वर संपर्क केला असता त्यांनी कळविले की, तुम्ही तात्काळ या माझ्या घरावर दगडफेक होत आहे. असे कळविल्याने सपोनि सोमनाथ नरके, गोपनीय शाखेचे विठ्ठल चव्हाण, पोअ शरद नवनाथ भारती, वाहन चालक बागलानी यांच्यासह पोलिस घटनास्थळी दत्तबाग तपेनिमगाव येथे दाखल झाले. सदर कॉलच्या अनुषंगाने विचारपुस केली असता येथे कसल्याही प्रकारची दगडफेक झाली नाही मी तुमची मजाक घेण्यासाठी कॉल केला होता असे त्यांनी सांगितले. तसेच सदर घटनेबाबत आम्ही गावातील गणेश सोपानराव चोपडे, भागवत बाबासाहेब धायगुडे यांना विचारपुस केली असता येथे कुठेही दगडफेकीसारखी घटना घडलेली नाही. त्यानंतर पोलिस परत निघत असताना पान २ वर...

# विकासाच्या नावाखाली तालुका लुटला

**प्रश्नचिन्ह :आ.नमितांचा विकास गेला कुठे**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपचे केज विधानसभेतील आमदार नमिताताई मुंदडा यांनी आधी केज विधानसभेतील खेडोपाड्यातील शहरातील रस्ते पहा,फिरा,पडा.हातपाय मोडून घ्या.डोके फोडून घ्या,दात पाडून घ्या,ओठ फाडून घ्या,मग बोला,भाषण करा.मुंदडा कुटुंबाने काही मतलबी कार्यकर्ते तयार केले आहेत.त्यांना हवा भरली किंवा दम भरला यु करू,त्यु करू.म्हणजे लोकसभा आणि विधानसभा आपणच जिंकायची आहे.पण यांना लोकसभेच काही देण घेण नाही.फक्त आपली आमदारकी सुरक्षित ठेवायची आहे.ते ही काही



भाजपच्या केज तालुक्यातील स्वार्थी नेते व कार्यकर्त्यांच्या जिवावर. आमदाराने निधी आणायचा त्यात आपली टक्केवारी काढून घ्याची.मग ते काम गुत्तेदाराला द्यायचे मग स्थानिक नेत्यांना गुत्तेदारा कडून टक्केवारी घ्यायची त्यात पुन्हा अधिकाऱ्यांची टक्केवारी मग काम कसले होणार? बोगसच होणार रस्त्या मध्ये खुप मोठ्या प्रमाणात घोटाळे झाले आहेत.काही कार्यकर्त्यांना हाताशी धरून पान २ वर...

# कारवाई करण्याचे आश्वासन धूळखात!

**छानराज क्षेत्रे:जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन!**

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाथर्डी व नेवासा पंचायत समितीचे आरोग्य विभाग, शिक्षण विभाग व ग्रामविकास विभाग या संदर्भात गेली अनेक वर्षे पाठपुरावा करून देखील मा मुख्य कार्यकारी अधिकारी हे वरिष्ठ अधिकारी यांना वाचवतात दि १२/०६/२०२३ रोजी मा चंद्रकांत गुडेवार उप आयुक्त (विकास)यांनी मा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना लेखी आदेश देऊन देखील काही महिन्यांनी म्हणजे २९/११/२०२३ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे मिटिंग घेतली व कारवाई करण्याचे आश्वासन दिले ते आजपर्यंत पुर्ण केले नाही मग पुन्हा ४/१/२०२४ रोजी २६ जानेवारी



२०२४ रोजी आंदोलन चा इशारा दिला त्यानंतर मा डी पी एम यांनी ठोस कारवाई चे आश्वासन दिले ते देखील आजपर्यंत पुर्ण नाही.

आरोग्य विभाग ची चौकशी पूर्ण होऊन अहवाल येऊन वर्ष झाले, ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांचे १ते४ भरून दोन वर्षांपेक्षा जास्त काळ झाला तरीही कारवाई नाही या सर्वांना मा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर हे पाठीशी घालत आहेत.

शिक्षण विभागात तर फक्त गुन्हा दाखल होऊन काही तास होत नाहीत तोच शिक्षक निलंबित मग शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्यावर अनुसुचित जाती जमाती कायद्या नुसार पान २ वर...

# केजमध्ये महसुल संघटनेचे आंदोलन

**आक्रमक:आकृतीबंध तात्काळ मंजूर करा**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यामध्ये महसूल कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यासाठी दि. १० पासून सुरू झालेल्या असलेल्या महसूल कर्मचाऱ्यांच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील केज तहसील मधील संपूर्ण महसुली कार्यालयातील कर्मचारी यांनी १० जुन रोजी काळ्याफिती लावून आंदोलनाला सुरवात केली आहे. दांगट समितीचा अहवाल स्वीकारून महसूल विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करणे, महसूल विभागातील महसूल सहाय्यक, महसूल



कर्मचारी यांचा ग्रेड पे वाढवून देणे व रिक्त पदे तात्काळ भरणे आदी मागण्यांबाबा महसूल कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे. यापूर्वी झालेल्या आंदोलनात राज्य शासनाने राज्य महूसल कर्मचाऱ्यांना मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र, त्या आश्वासनाची पूर्ततः होत नसल्याने महाराष्ट्र राज्यातील सर्व महसुली कर्मचाऱ्यांकडून १० जुलैपासून टप्प्याटप्प्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. या अनुषंगाने दि. १० रोजी पहिल्याच दिवशी काळ्याफिती लावून कार्यालयीन काम करुन ११ जुलै रोजी दुपारनंतर पान २ वर...

**आक्रमक** | **४२ कामगारांचे आमरण उपोषण**

# कंत्राटी कामगारावर उपासमारीची वेळ !

केज/ पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील हातावर पोट असणारे अनेक महावितरण कंत्राट कामगारावर तीन महीण्या पासुन पगार नसल्याने उपास मारीची वेळ आली आहे त्यामुळे १६/०७/२०२४ पासुन ४३ कंत्राट कामगार बीड मंडळ कार्यालय येथे अमरण उपोषणाला बसणार आहेत याविषयी सविस्तर वृत्त असे की सर्व वीज कंत्राटी कामगार केज विभाग यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे की कि आम्हांला माहे,एप्रिल, में, जून, तीन महिन्याचे पगार (पेमेंट) अजून झाले नाही. ३महिने आमची पगार झाली नाही आमच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ३ महिने पगार नसल्यामुळे आम्ही आमच्या घरात किरान भरु शकत नाही ३ महिने पगार नसल्याने घरातील




व्यक्ती आजारी पडल्यावर आमच्याकडे उपचारासाठी पैसे नाहीत ३ महिने पगार नसल्याने मुलांच्या शिक्षनाचा खर्च करू शकत नाही ३ महिने पगार नसल्याने स्वतः च्या तबियत ची काळजी घेऊ शकत नाही ३ महिने पगार नसल्याने आई वडिलांना मेडिकल गोळ्या देऊ शकलो नाही एक आवर्जून विनंती, आम्हा कामगार यांच्या घरात कोणाचे आई वडील आजारी, तर कोणाचे बायकोचा दवाखाना तर कोणाच्या लेकराचं शिक्षण तर कोणाचं पोटच फक्त या कामावर अवलंबून आहे, म्हणून साहेबाना विनंती आहे लवकर आमची पगार (पेमेंट) करावी आपल्या माहितीस्तव असे निवेदन देऊन यावर काही दखल घेण्यात नाही आली तर आम्ही सर्व कामगार केज सब डिव्हिजन मध्ये पासुन दि. १३/०७/२०२४ पासून काम बंद आंदोलन करणार आहोत. व १६/०७/२०२४ पासून मंडळ कार्यालय बीड या ठिकाणी आमरण उपोषण केज सब डिव्हिजन मधील ४२ पान २ वर...

# परळीमध्ये महामॅराथॉन स्पर्धेचे आयोजन!

**नियोजन:धनजय मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा**

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याचे कृषीमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजयजी मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार (दि.१५) जुलै रोजी सकाळी ७ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी-वै च्या वतीने शालेय गट,खुला गट,ज्येष्ठ नागरिक गट,महिला गट या चार गटात 'महामॅराथॉन स्पर्धा' आयोजित केली असून 'ग्रीन परळी स्वच्छ परळी हा निर्धार या 'महामॅराथॉन' स्पर्धेत आपण सर्वानी घ्यायचा आहे.'महामॅराथॉन' स्पर्धेत प्रत्येक गटात आकर्षक पारितोषिक,मानचिन्ह प्राप्त होणार असून सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रविण्य प्रमाणपत्र आणि एक वृक्ष




भेट दिले जाणार आहे. तेंव्हा आबालवृद्ध नागरिकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून 'हरीत परळी स्वच्छ परळीचा निर्धार घ्यावास्पर्धा सुरु होण्याचे ठिकाण परळी शहर पोलीस स्टेशन समोरुन 'संत सेवालाल महाराज चौक' असून थेट स्पर्धा ठिकाणी नोंदणी करण्यात येईल तसेच पूर्वनोंदणी करण्यासाठी परळी तालुका शारीरिक शिक्षक संघटनेचे अध्यक्ष एस.पी.मुंडे सर ९४२१२७१६०८, राष्ट्रवादी शिक्षक आघाडीचे अध्यक्ष अजय जोशी पान २ वर...